माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज विरचित

# हरिपाठ

(हरिपाठाचे मर्मलक्षी विवेचन)

आणि

अनिल सहस्रबुद्धे विरचित

# महर्षी अगस्ती नित्यपाठ अभंग


लेखक

प्राचार्य डॉ. अनिल नागेश सहस्रबुद्धे



प्रकाशक

आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर

महाराष्ट्र, भारत

प्रकाशन मंच

**माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज विरचित**
**हरिपाठ (हरिपाठाचे मर्मलक्षी विवेचन) आणि**
**अनिल सहस्रबुद्धे विरचित**
**महर्षी अगस्ती नित्यपाठ अभंग**
Haripath & Agasti Nityapath Abhang

**लेखक**
**प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे
मो. ९८५०७३१६४०

**प्रकाशक :** आनंदोत्सव प्रकाशन मंच
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट
'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७
भ्रमण भाष- ९८८१५००९४२
usahasrabuddhe@gmail.com
Website - www.anilsahasrabuddhe.com

**प्रथमावृत्ती :** २०२२

**टाईपसेटींग :**
श्रीपाद कुलकर्णी, अहमदनगर
मो. ९८५०२३२८९०

**मुद्रक :** कुलकर्णी टाईपसेटर्स, अहमदनगर

**मूल्य** १००/-

विशेष निवेदन : 'आनंदोत्सव'प्रकाशन मंच केवळ, प्रकाशनार्थ मंच, विनामूल्य सेवा उपलब्ध करून देतो. ग्रंथनिर्मिती, वितरण, आयव्यय याशी आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचा कोणताही, कोणत्याही प्रकारे संबंध नाही.

ग्रंथनिर्मितीचा संपूर्ण खर्च सौ. उषा सहस्रबुद्धे यांनी केला असून, त्यातून मिळणारे उत्पन्न सेवाभावी ट्रस्टना देण्याचा संकल्प केला आहे.

या पुस्तकातील मतांशी प्रकाशन मंच सहमत असेलच असे नाही.



महर्षी अगस्ति मुनी - पायी दिंडी सोहळा
अगस्ति आश्रम अकोले ते पंढरपूर आणि
अकोले ते त्र्यंबकेश्वरचे आयोजक हरिभक्ति परायण-
**ह.भ.प.ॲड. के. डी. धुमाळ साहेब**
अध्यक्ष
श्री अगस्ति ऋषी देवस्थान ट्रस्ट
व
समस्त विश्वस्त मंडळ

* * *

**ह.भ.प. आत्माराम महाराज शेळके व ह.भ.प. विष्णू महाराज वाक्चौरे**
यांची परंपरा पुढे नेणारे
**ह.भ.प. राजेंद्र महाराज नवले**
अध्यक्ष
महर्षी अगस्ति मुनी पालखी तथा रथ - अकोले ते पंढरपूर आणि
अकोले ते त्र्यंबकेश्वर पायी दिंडी सोहळा

* * *

**श्री. आर. के. मुतडक**
सेवारत-नियोजन व व्यवस्था प्रमुख
श्री अगस्ति ऋषी देवस्थान ट्रस्ट
आणि
नियोजन व व्यवस्था सेवक, महर्षी अगस्ति मुनी पालखी तथा रथ -
अकोले ते पंढरपूर आणि त्र्यंबकेश्वर
पायी दिंडी सोहळा

* * *

गत एक तप सातत्याने पायी दिंडी सोहळ्यात सहभागी सर्व ह.भ.प. वारकरी

**यांना**
**प्रेमपूर्वक सादर समर्पण**



माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज विरचित

# हरिपाठ

संत श्री ज्ञानेश्वर महाराज विरचित हरिपाठ; हरिभक्ती परायण म्हणविणाऱ्या, सर्व भक्तांना प्रिय आहे. समस्त मराठी माणसाला; म राठी, माऊली, ज्ञानेश्वरी एवढाच, हरिपाठ परिचित आहे. नित्योपासनेचे परिमाण या हरिपाठाला आहे. सांप्रदायिकांच्या दैनंदिन जीवनक्रमाचा तो अविभाज्य भाग आहे. संत श्री ज्ञानेश्वर महाराजांनी हरिपाठ आविष्कृत केल्यानंतर, अनेक संतांनी, त्यांचे अनुकरणही केले आहे.

पाठ म्हणजे ग्रंथाचे एकदा, पूर्णतः केलेले वाचन. उपासनेतील व्रत म्हणूनही अनेक ग्रंथांचे पाठ केले जातात. उदा. सप्तशतीचा पाठ, शांतीपाठ इ. पाठ करणे म्हणजे अभ्यास करणे होय. अभ्यास म्हणजे, पद्धतशीरपणे ती गोष्ट पुन्हा पुन्हा, वारंवार नित्य करणे. अभ्यास म्हणजे त्या विशिष्ट ज्ञानात्मक गोष्टीचे, चिंतन, मनन, उच्चारण, एवढ्या वारंवार करणे; की ती ज्ञानात्मक गोष्ट, हा मानवी तनमनाचा स्वभाव होऊन; मानवाचे वर्तन स्वाभाविकपणे घडावे. हरिपाठातून प्रेरित केलेले तत्त्वज्ञान आणि त्यानुसारची जीवनशैली हा माणसाचा स्वभाव व्हावा; अशीच अपेक्षा, 'ज्ञानदेव तू कैवल्यम्' या विभूतिमत्त्वाचीही असावी. हरिपाठाचे, या दृष्टीने, पुन्हा पुन्हा चिंतन करणे आवश्यक वाटते; किंबहुना असे चिंतन आत्मशोधनासाठी ते आवश्यक वाटते.

ह.भ.प. मामासाहेब दांडेकर प्रासादिक, 'सार्थ श्री ज्ञानेश्वरी'चे

संपादक डॉ. गोपाळराव गोविंद बेणारे यांनी 'सरस्वती ग्रंथ भांडार'ने प्रसिद्ध केलेल्या प्रतीत, अखेरीस, 'श्री ज्ञानेश्वर महाराज हरिपाठ' जोडला आहे. त्यात मंगलाचरण म्हणून संत श्री तुकोबारायांचा 'सुंदर तें ध्यान उभें विटेवरी' हा अभंग दिला असून; हरिपाठाचे एकूण एकोणतीस अभंग दिले आहेत. पहिल्या नऊ अभंगांनंतर भजन : ।। रामकृष्णहरी ।। जय जय रामकृष्णहरी ।। असे देऊन; पुढील दहा ते अठरा अभंगांनंतर भजन : ।। विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल ।। असे दिले आहे. एकोणतिसाव्या अभंगानंतर ।। इति श्री ज्ञानेश्वर महाराज हरिपाठ समाप्त ।। असे लिहून हरिपाठाचे ग्रंथरूप आणि पाठपद्धति सादर केली आहे.

'हरिपाठ' हा सलग असा श्री ज्ञानेश्वरी किंवा अमृतानुभवासारखा ग्रंथ नाही. प्रत्येक अभंग ही स्वतंत्र स्वयंपूर्ण अशी भावोत्कट रचना असते; तसेच हे एकोणतीस अभंग आहेत. 'हरिपाठ' म्हणून हे एकोणतीस अभंग हरिभक्तीची एक वहिवाट नक्कीच सिद्ध करतात. भक्ती, ज्ञान आणि वैराग्य अशी भक्तिसाधनेची प्रक्रिया आहे. अर्थातच हरिपाठाच्या नित्य पाठाने ही प्रक्रिया साधेल; असा ठाम विश्वास पाठकांच्या ठायी परंपरेने दृढावला आहे; हे अनुभवता येते। 'संतवचनांची मात' (अर्थात 'संतवचनांचे मर्मलक्ष्यी चिंतन') हा मी लिहिलेला व 'गंधर्व-वेद'ने प्रसिद्ध केलेला ग्रंथ सादर झाल्यानंतर; हरिपाठातील अभंगांचे एकत्रित असे या स्वरूपाचे चिंतन मांडावे असा आग्रह झाला. माऊलींच्या सप्तशतकोत्तर संजीवन समाधीच्या रौप्यमहोत्सवी वर्षात, म्हणजे, हरिपाठ आविष्कृत होऊन; सातशे वर्षे उलटून गेल्यावर; या पारंपरिक नित्योपासना ग्रंथाचे असे चिंतन करण्याचे हे सेवा-धाडस म्हणता येईल. माऊली संत श्री माऊलींचीच ही कृपा-आज्ञा आहे; असा भाव मनात दाटला आहे.

## (१)

**देवाचिया द्वारीं उभा क्षणभरी । तेणें मुक्तिचारी साधियेल्या ।।१।।**
**हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा । पुण्याची गणना कोण करी ।।२।।**



**असोनि संसारीं जिव्हे वेग करीं । वेदशास्त्र उभारीं बाह्या सदा ।।३।।**
**ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणें । द्वारकेचे राणे पांडवां घरी ।।४।।**

अभंगाच्या पहिल्या चरणात, माऊली ज्ञानेश्वर महाराजांनी मुक्ति साधण्याचा सोपा उपाय सांगितला आहे. मुक्ति म्हणजे निखळ आनंद होय. माणूस संसारप्रपंचात बद्ध असतो. मोकळं झालं, असं वाटलं की, माणूस आनंदी होतो.

हा मोकळेपणा दोन प्रकारचा असतो. एक म्हणजे तात्पुरत्या किंवा तात्कालिक अडकलेपणातून मोकळं होणं. संसार प्रपंचात अगदी लहानसहान गोष्टीत अडकून पडल्यासारखे वाटते. ती गोष्ट पूर्ण झाली किंवा नाहिशी झाली; की मोकळं वाटतं. संसारप्रपंचातला हा आडकलेपणा देखील अनेक प्रकारचा असतो. अगदी काही मिनिटांपुरता, तासांपुरता, दिवसांपुरता; एवढेच नव्हे तर महिनो न् महिने, जीवनाच्या विविध टप्प्यांवर वर्षानुवर्षे, जीवनभरासाठी देखील असतो. हा अडकलेपणा व्यक्तिगत, कुटुंबगत, जातीगत, समाजगत, ग्रामगत, परिसरगत, राज्यगत, राष्ट्रगत, विश्वगत; अशा व्यष्टीपासून समष्टीपर्यंत, विस्तारित स्वरूपात, माणसाला व्यापतो. संसारप्रपंचाची यातायात, या सर्व पातळीवर जीवनाला व्यापून असते. या अडकलेपणाच्या प्रत्येक स्थितीगतीमधून मोकळं व्हावं, ते लवकर मोकळं व्हावं असं प्रत्येकाला वाटतंच. ही प्रपंचाची यातायात; राग, लोभ, मद, मत्सर, द्वेष, स्पर्धा, मोह, असूया, सूड, सत्तालोलुपता, स्वार्थ आदि, सर्व वासनाभावनांनी भरलेली असते.

ह्या सर्व गोष्टी मानवी मनाला आत्मारामापासून दूर नेतात. मर्त्य जीवालाच अहंकारवश करतात. याच वासनाभावनांची परिपूर्ति करण्यासाठी धडपड करणे म्हणजेच जीवन; असे वाटू लागते. प्रत्येक माणूस या परिपूर्तीसाठी आशाळभूत होतो. आशा ही न संपणारी अशी, भौतिक जीवनातील भावना, माणसाचा ताबा घेते. माणसाला बंदीवान करते म्हणजे बद्ध करते. परिपूर्ती व्हावी; असे प्रत्येकाला वाटते पण

ती कधीच होत नाही! म्हणूनच, माणसाला मोकळे झाल्यासारखे वाटते ना वाटते; तोच तो पुन्हा अडकतो. परिपूर्तीसाठी, चिंता, क्लेष, हवे नको ते यत्न, वाकड्यातिकड्या, खळत्वपूर्ण क्लृप्त्यायुक्त्या असे, काही व्यक्तिगत वा समूहगत पातळीवर करू लागतो. यातच अडकत जातो. अडकण्याची ही शृंखला त्याला कशी तोडता येईल याचा, तो निकराने, भणंगपणाने विचार करू लागतो. यामुळेच माणूस सतत दुः खाचा अनुभव घेतो.

अडकलेपणा म्हणजे बद्धता हेच तर दुःखाचे कारण असते. त्यामुळेच संत श्री तुकोबाराय म्हणतात तसे दुःख पर्वताएवढे वाटू लागते. माणूस मोकळेपणालाच पारखा होतो. हा मोकळेपणा अर्थात आनंद अर्थात सुख अर्थात मुक्तता मिळावी असे सर्वांनाच वाटते. निदान काही प्रमाणात का होईना ही मुक्तता हवीच; अशी आस प्रत्येकाच्या मनाला लागते. यावरचा उपाय केवळ जीवनमुक्त असा संतच सांगू शकतो.

संत श्री माऊली ज्ञानेश्वर महाराज हे या जीवनमुक्ततेसाठीचा उपाय सांगतात. जीवनमुक्तता म्हणजेच निखळ आनंद एकदम, सद्गुरूने उपाय सांगितला आणि मिळाला; असे होत नाही! त्यासाठी टप्प्याटप्प्याने जावे लागते. सलोकता, समीपता, सरूपता आणि अखेर सायुज्यता असे हे टप्पे; ऋषी, मुनी, तपस्वी, सिद्ध, योगी, साधु संत यांनी; स्वानुभवसिद्ध शास्त्राधारे सांगितले आहेत.

या प्रत्येक टप्प्यासाठीचा साधनाउपाय माऊली ज्ञानेश्वर महाराज माऊली सांगतात. तो उपाय म्हणजे 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी।' हा होय.

हे देवाचे द्वार कोणते? त्या द्वाराशी क्षणभर उभे राहायचे म्हणजे काय करायचे? हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात येणे स्वाभाविक आहे. भारत हा मंदिरांचा देश आहे. यातील कोणत्या देवाच्या द्वाराशी जाऊन उभे राहायचे? ही मंदिरांची मांदियाळी साधुसंतांनीच तर उभी केली. बद्ध माणसाला त्याच्यासारख्याच सगुण साकार रूपात, देव पाहाता येतो.



स्थल, काल, परिस्थिती स्वभाव आणि संसारप्रपंचातील सर्व प्रकारची यातायात लक्षात घेऊन; साधुसंतांनी लोकनिष्ठ अध्यात्मवादी भूमिकेने देव आणि मंदिरांची मांदियाळी केली. तत्त्वज्ञानाचा लोकपातळीवरील सोपेपणासाठीचा हा उपाय आहे. म्हणूनच यातील कोणत्याही मंदिरातील, कोणत्याही देवाच्या द्वारी जाण्यास हरकत नाही. आई जशी लडिवाळाच्या कलाकलाने लडिवाळाला प्रसन्न करते; तसेच हे आहे.

'सर्व देव नमस्कृत्यं केशवं प्रति गच्छति' हे सूत्रही त्याच साधुसंतांनी सांगितले. म्हणजे देवाच्या द्वारी जाणे महत्त्वाचे. सर्व देव हे त्या एकाच स्वरूपाचे, स्वरूप आहेत. ते एकच 'आद्य स्वसंवेद्य आत्मरूप', विश्वातील अर्थात चराचरातील सर्वरूपांत प्रकटले आहे. सर्व रूपांच्या ठायी; म्हणजे अगदी चराचरातील अणुरेणूपासून माणसापर्यंतच्या, रूपांच्या ठायी ते आत्मरूप अर्थात स्वरूप आहे. याच स्वरूपाला आपण माणसाचं जिवंतपण असं म्हणतो. माणसातील चैतन्य म्हणतो. माणसातील जीव म्हणतो.

याचा स्पष्ट अर्थ असा की, मंदिर हे धाम आणि त्यातील– शिव, भवानी, राम, कृष्ण, विठ्ठल, म्हसोबा, बिरोबा इ.इ.इ. देव म्हणजे आत्मरूप अर्थात स्वरूप होय. जीवाच्या धामात म्हणजे शरीरात तोच आत्मरूप देव आहे. तो आहे तोवर तो देह मंदिर आहे! तो असल्याने मंदिराला मंदिरपणा आहे. माणूसपण किंवा अंतरात्मा, या देहाला विश्वातील यातायातीत स्वतंत्र, स्वयंपूर्ण अस्तित्व देतो. मानवी देह हे मंदिर आणि जीवात्मा हा देव आहे. मग या मंदिराचे द्वार कोणते? द्वार उघडे असेल तर देव दिसतो. म्हणजे दाराचा उघडेपणा आणि देवाचे दर्शन यात स्वरूपसंबंध आहे. माणसातील जिवंतपणाचा अनुभव त्याच्या शरीरामुळे येत नाही; तर माणसाच्या मनामुळे हा अनुभव येतो. म्हणजे मन आणि अंतरात्मा यांचा स्वरूपसंबंध आहे. म्हणूनच मन हेच देहमंदिरातील आत्माराम या देवाचे द्वार आहे.

या मनोद्वारापाशी क्षणभर उभं राहायचं, ते कसं? मन संसारप्रपंचाच्या

समग्र यातायातीत गुंतलेलं आहे. म्हणजेच ते मन द्वार बंद आहे. मग देवाजवळ म्हणजे आत्मरूपापर्यंत कसं जाता येणार? म्हणून ते दार आधी उघडलं पाहिजे. मनोद्वार उघडायचे म्हणजे संसारप्रपंचाची यातायात बाजूला करायची. कसं शक्य आहे ते? त्यालाच तर प्रयत्न, म्हणजे तप करावे लागेल. तो प्रयत्न क्षणभर करा; असे माऊली सांगतात.

संसारप्रपंचाची सर्व यातायात क्षणभरासाठी विसरून; मनोद्वार उघडून उभे व्हायचे म्हणजे सिद्ध व्हायचे अर्थात जागे व्हायचे अर्थात जिवंत व्हायचे होय. हाच, सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता या चारही मुक्ती मिळविण्याचा उपाय होय. जीवनमुक्ततेचा निखळ आनंद क्षणभर का होईना घेण्याचा प्रयत्न करा. म्हणजे खरं सुख, खरा आनंद कुठे आहे तो कळेल. तो आनंद चार मुक्तींमध्ये आहे हे ऋषीमुनी, साधुसंत सांगून गेले. त्या मुक्तीचा क्षणभर आनंदानुभव मिळाला की सर्व सुखांचा ठेवा सापडेल.

मनोद्वार उघडण्यासाठी; म्हणजे संसारप्रपंचाची यातायात बाजूला सारण्यासाठी; अर्थात यातायातीला फार महत्त्व न देता; दुर्लक्ष करून मनाची कवाडे उघडण्यासाठीचा उपाय माऊली ज्ञानेश्वर महाराज सांगतात. तो उपाय म्हणजे; 'हरि मुखे म्हणा, हरि मुखे म्हणा' हा होय. याचाच अर्थ नामभक्तीचा उपाय माऊलींनी सुचविला आहे.

अभंगाच्या या दुसऱ्या चरणात भक्तिमार्गाची अर्थात नामभक्तीची महती माऊलींनी अधोरेखित केली आहे. नारदादि संतांनी नवविधा, पंचविधा अशा अनेकविधा भक्तीचे मार्गदर्शन केले आहे. निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापी, अविनाशी असे तत्त्व; हरि या सगुणरूपाने, सगुण अशा माणसाला, केवळ त्याच्या नामस्मरणाने, अनुभवता येते. हे अनुभवण्याचे पुण्य 'हरि' नामस्मरणाने मिळते. ह्या पुण्याची कोणीही गणना करू शकत नाही एवढे हे पुण्य केवळ 'हरि' नामस्मरणाने (अर्थात कोणत्याही देवाच्या अथवा विभूतिमत्त्वाच्या नामस्मरणाने) प्राप्त होते. हे माऊलींनी घोषित केले आहे. ते म्हणतात,



'पुण्याची गणना कोण करी'.

लौकिक संसारप्रपंच व्यवहारात नीतिशास्त्राधारे पापपुण्याची कल्पना मांडलेली आहे. पापाने माणूस अधोगतीस जातो; तर पुण्याने तो उर्ध्वगतीस, म्हणजे परमेश्वराप्रत जातो. पाप आणि पुण्य ह्या दोन्ही कल्पना कर्मपरतेशी जोडलेल्या आहेत. लौकिकात अशा कर्मांची गणना केली जाते. पुण्यवान आणि पापी असे संबोधिले जाते. पुण्यकर्म म्हणजे सर्वाभूती परमेश्वर आहे हे सतत स्मरत, अनुभवत सत्यनिष्ठेने, प्रेमपूर्वक, कारुण्याने व्यवहार करणे होय. 'हरि' नाम भक्तीने, असे पुण्यकर्म करण्याचा स्वभावच होतो. त्यामुळे अखंड नामस्मरणाने अगणित पुण्यप्राप्ती होऊन; सलोकता, समीपता, सरूपता आणि सायुज्यता या क्रमाने पूर्ण जीवनमुक्तता अर्थात निखळ आनंदमयता अनुभवता येते. माऊली ज्ञानेश्वर महाराजांनी जीवनमुक्ततेसाठीचा असा सोपा उपाय सांगितला आहे. देवाच्या द्वारात क्षणभर उभे राहिले तरी सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता या चारी मुक्ती साधता येतात. हे करण्याचा सोपा उपाय म्हणजे 'हरि'नाम भक्तीचा अनुसार करणे होय. त्यामुळे आपसुकच सत्कर्म घडून जीवनमुक्तीचा आनंद अनुभवता येईल.

'हरि'नाम भक्तीचा उपाय सुचवितांनाच माऊली ज्ञानेश्वर महाराज पापपुण्याच्या गणनेकडे म्हणजे कर्मशैलीकडे लक्ष वेधतात. याचा स्पष्ट अर्थ असा की; मानव जन्मात एवढेच काय जीव जन्मात कर्म अपरिहार्य आहे. किंबहुना कर्मशीलता, हेच तर त्या स्वरूपाचे, बहुरूपांच्या ठिकाणी स्वसंवेद्य आत्मरूपाने प्रकटणे आहे. ही कर्मशीलता, स्वरूपाच्या ज्ञानात्मकतेने, म्हणजे स्वतःतील आत्माराम उरकून; ही वासना देहाच्या वासनाभावना लहरीनुसार बद्धपणे होते; यावरच दुःखपूर्ण बद्धभोग्यता आणि आनंदपूर्ण जीवनमुक्तता अवलंबून आहे.

वासनादेहाच्या वासनाभावनांच्या गराड्यात जगत असतांनाही, प्रत्येकाला मुक्त आनंद भोगावासा वाटतोच! तो तर वासनाभावनांच्या

पलिकडे असतो. वासनाभावना बाजूला सारल्याशिवाय मुक्त आनंद कसा मिळणार? म्हणजेच कर्मशैलीला संस्कारित करणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठीच 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी' हा उपाय माऊलींनी सांगितला. चराचराविषयीची आणि प्रामुख्याने माणसाविषयीची अपार करुणा, ठायी असल्यामुळेच, माऊली ज्ञानेश्वर महाराज तिसऱ्या चरणात कर्मशैलीचे स्वरूप सांगतात.

'असोनि संसारीं जिव्हे वेगु (वेधु) करी' अशी वर्तन किंवा कर्मशैली ठेवावी. देवाच्या द्वारात क्षणभर देवदर्शन करण्यासाठी, जीवनमुक्तीचा अर्थात केवळ आनंदाचा अनुभव घेण्यासाठी; संसाराचा त्याग करून; विजनवासात जाण्याचे कारण नाही. केवळ जिव्हेने म्हणजेच वाणीने स्वरूपाकडे 'वेगु' घ्यावा, धाव घ्यावी अर्थात वाणीने स्वरूपाचा अर्थात देवाचा वेध घ्यावा. वाणीने अर्थात जिव्हेने वेध घेणे म्हणजेच नाम म्हणणे होय. संसारातील सर्व कर्मे करतांना वाणीने नामोच्चार करीत असावे. जिव्हेला नामोच्चाराचे वळण लावावे अर्थात सवय लावावी म्हणजे जिव्हेला स्वरूपाची ओढ लागेल. 'करी' असे सांगून नामोच्चाराची जिव्हेला सवय लावावी असे संत श्री ज्ञानेश्वर महाराज सांगत आहेत.

कर्मशैलीमध्ये जिव्हेकडे हे काम सोपविले तर कर्मशैलीचे स्वरूप कोणत्या प्रकारचे दिसेल किंवा दिसावे अशी अपेक्षा माऊली करतात; हे समजून घेणे आवश्यक आहे. माऊली सांगतात, कर्मशैली अनुसरतांना मात्र, बाह्यता वेदशास्त्राचे देहाने पालन करणे आवश्यक आहे. 'वेदशास्त्र उभारीं बाह्या सदा' असे सांगतांना माऊलींना; 'वेदशास्त्र टाकून द्या!', 'वेदशास्त्र बाहेर फेका!' किंवा 'वेदशास्त्राचा त्याग करा!' असे सांगायचे नाही. जिव्हेने 'हरि' नाम स्वभावतः सुरू ठेवले की आपण जे कर्म करीत आहोत; ते जिवंत अथवा चैतन्यशाली आहोत म्हणजेच अंतरीच्या 'हरि' योगे, अर्थात अंतरात्म्याच्या स्वसंवेद्य स्वरूप स्थितीमुळे होय; याचा विसर पडणार नाही. त्या 'हरि'चे स्मरण झाले की; त्या आत्मारामाच्या आविष्कारामुळे आपण हे संसारप्रपंचातील भौतिक कर्म, केवळ त्याचे



आविष्कार कर्तव्य या भावनेने करू. म्हणजेच आपली स्वतःची स्वार्थपरता नव्हे तर कर्तव्यता आहे हे ज्ञान होईल.

हे ज्ञान झाले की; वासनादेहाच्या वासनाभावनांविषयी अलिप्तता अर्थात वैराग्य प्रकटेल; असे माऊली श्री ज्ञानेश्वर महाराजांना सांगावयाचे आहे. थोडक्यात, संसारात असतांना, जिव्हेच्या योगाने, नामभक्तीचा आश्रय केला की; आत्मारामाची संवेद्यता कर्माला येईल आणि कर्माच्या ठिकाणी निर्लेपता येईल. मनाचे कवाड उघडेल. ज्ञानाने मन स्वरूप होईल. त्याचा आविष्कार म्हणजे कर्म घडू लागेल.

एक प्रकारे वेदशास्त्रांनी ज्या सर्व कल्याणात्मक नीतिसूत्रांच्या योगाने कर्मशैली सांगितली आहे; त्याचा अनुसार होऊ लागेल. एक प्रकारे माऊली श्री ज्ञानेश्वर महाराज, नामभक्ती – ज्ञान – वैराग्य अर्थात निष्काम कर्माचे सूत्र प्रतिपादित करतात.

हे कसे घडेल यासाठी संत श्री माऊली ज्ञानेश्वर महाराजांनी भगवान व्यासांनी दिलेले पांडव-कृष्ण संबंधाचे प्रमाण दिले आहे. पांडव सतत श्रीकृष्णांचा धावा करीत होते. या कृष्णभक्तीमुळे ते कृष्णस्वरूप झाले. भगवान श्रीकृष्ण ज्या निर्लेपतेने, स्वसंवेद्यता या स्वभावाने, विश्वस्वरूप होऊन; विश्वक्रीडा करीत होते; तरी त्यातून पूर्ण स्वतंत्र व केवळ ज्ञानमय होते. अगदी तसेच पांडव श्रीकृष्ण स्वरूप होऊन; निष्काम कर्म करीत होते. केवळ कर्तव्य म्हणून कर्म करीत होते. पांडवांच्या घरात अर्थात अंतरंगात, द्वारकेचे राणे भगवान श्रीकृष्ण होते. त्यांचीच लीला म्हणून पांडवांचे महाभारत घडत होते.

महाभारत ही तर जीवनसंघर्षाची धगधगती कथा. हा संघर्ष केवळ त्या परमेश्वराची लीला म्हणून पांडवांकडून घडत होती. तसेच आपल्या ठायीच्या आत्मरूप अशा 'हरि' स्मरणाने 'हरिलीला' स्वरूपात जीवनकर्माचे ज्ञान होईल.

वरवर पाहाता सर्वकल्याणात्मक अशा वेदशास्त्रानुसार जीवनशैलीच्या, धर्मकर्ममीमांसात्मक पद्धतीने आपण कर्म करीत आहोत

असे होईल. जीवनच ज्ञानपूर्ण कर्मसाधना होईल. जीवन हेच भक्तिरूप प्रकटेल. असे माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज सांगतात. म्हणूनच ते पहिल्या चरणात 'देवाचिया द्वारी उभा क्षणभरी । तेणे मुक्ति चारी साधियेल्या ।।' असे आश्वासित करून; साधना उपाय म्हणून अगणित पुण्यप्राप्तीचा उपाय अर्थात प्रत्यक्ष ज्ञानप्राप्तीचा, प्रपंचात सहज सोपा, उपाय म्हणून 'हरि मुखे म्हणा, हरि मुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ।' असा उपायही सुचवितात. त्यासाठी शेवटच्या चरणात पांडवांचे प्रमाण देतात.

## (२)

हरिपाठाच्या दुसऱ्या अभंगात माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराजांनी 'वेदशास्त्र उभारीं बाह्या सदा', या त्यांच्या सांगीचा अर्थ तात्त्विक दृष्टीने स्पष्ट करून; मार्गदर्शन केले आहे.

**चहूं वेदीं जाण साहीशास्त्रींकारण । अठराही पुराणें हरीसी गाती ।।१।।**
**मंथुनी नवनीता तैसे घे अनंता । वायां व्यर्थ कथा सांडीं मार्गु ।।२।।**
**एक हरि आत्मा जीवशिव समा । वायां दुर्गमा न घालीं मन ।।३।।**
**ज्ञानदेव पाठ हरि हा वैकुंठ । भरला घनदाट हरि दिसे ।।४।।**

वेद, शास्त्र, पुराणे हरिचीच चर्चा करतात. 'हरि' म्हणजे काय? हरि लीला कशी? सहाशास्त्र निर्मितीचे कारण हरिच कसा आहे; याचेच निरुपण केले जाते. सर्व सत्य अशा, विद्यांचे ज्ञान-विज्ञान वेदात सांगितले आहे. वेद म्हणजेच ज्ञान. ज्ञान म्हणजेच निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापी, आद्य, केवल, पूर्ण, स्वसंवेद्य असे आत्मरूप होय. आत्मरूप म्हणजेच हरि. हे आत्मरूपच प्रत्येक आविष्काररूपात स्वसंवेद्यपणे स्थित आहे. म्हणजेच माणसातही अंतरंगात तोच स्वसंवेद्य आत्मरूप असा हरि, अंतरात्मा, जीवात्मा म्हणून स्थित आहे. याचाच अर्थ वेद म्हणजेच हरि होय. वेदांग म्हणून प्रसिद्ध असलेल्या १) शिक्षा २) कल्प ३) निरुक्त ४) व्याकरण ५) छंद आणि ६) ज्योतिष. या सहा वेदांगांच्या आणि न्याय, वैशेषिक, योग, मीमांसा, सांख्य आणि वेदांत या सहाही शास्त्रांच्या निर्मितीचे कारण म्हणजे 'हरि' विषयीची जिज्ञासा होय. 'हरि' हाच साहीशास्त्रांच्या निर्मितीस प्रेरक होय. 'हरि' अर्थात स्वसंवेद्य आत्मरूपाच्या आविष्कारांचे म्हणजेच महतत्त्व, महाशक्ती, यांची विविध रूपे अर्थात ब्रह्मा, विष्णू, महेश, महामाया, महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती इ.इ. देवदेवता रूपे यांच्या लीलांचे, ज्ञानी अर्थात हरिरूप झालेल्या ऋषीमुनी इ.च्या लीलांचे वर्णन पुराणांमध्ये असते. म्हणजे सर्व पुराणे हरिलीलांचेच गुणगान करतात असे अभंगाच्या पहिल्या चरणात स्पष्ट केले आहे.

हे सांगून माऊली संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, दुधाचे दही, दह्याचे ताक या सर्व अवस्थांचे मंथन केले तर तत्त्वरूप किंवा साररूप असे नवनीत अर्थात लोणीच प्रकटते. तसे वेद, शास्त्रे आणि पुराणे यांचा धांडोळा केला, अर्थात मंथन केले; तर तत्त्वरूप असा निष्कर्ष स्वसंवेद्य आत्मरूप असा 'हरि' एवढेच तत्त्व अर्थात 'हरि जो अनंत म्हणून प्रसिद्ध आहे तोच शिल्लक राहातो.' संसारप्रपंचामध्ये वेद, शास्त्र, पुराणे इ.चा अभ्यास करण्यासाठी वेळ नसतो म्हणून प्रापंचिकांनी त्या हरिशीच घ्यावे. म्हणजेच त्या अनंत अशा 'हरि'चे भजन करावे.

वेद, शास्त्र आणि पुराणे यात वर्णित, निवेदित, मंडित कथा, विधीमार्ग, संप्रदाय इ. गोष्टींत, संसारप्रपंचातील कर्तव्यतत्परता सोडून, वाया अर्थात व्यर्थ वेळ घालवू नये. म्हणजेच वेद, शास्त्रे, पुराणे इ. गोष्टी बाजूला ठेवून अर्थात सांडून; तत्त्व स्वरूप अशा 'हरि'चे भजन करावे. असे दुसऱ्या चरणात समजावून सांगतात.

तिसऱ्या चरणात मानवी जीवाचे असणे कसे आहे; ते समजावून सांगतांना एक 'हरि' हाच देहातील देह आणि शिव म्हणजे जिवंतपण आहे. म्हणजेच शिव स्वरूप हे मानवाच्या ठिकाणी देहरूपाने नटले आहे

हे लक्षात घ्यावे. देह हा पंचभौतिक पदार्थांनी, म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश यांनी बनला असल्याने; त्या देहा ठायी त्या पंचभौतिकांचे गुणधर्म प्रकटतात. त्यांनाच आपण देहाच्या वासना असे म्हणतो. तो देहच त्या गुणधर्मात अडकतो व तेच आपले अस्तित्व आहे अशा अहंकारात वश होतो. त्या देहाला आपण जीव असे म्हणतो हा जीव वासनांत अडकतो. या बाबतीतच माऊली सर्वांना 'जीवशिवसमा' या तत्त्वनिर्देशाने सावध करतात.

शरीरातील सर्व पंचभौतिक पदार्थ आपापल्या स्वाभाविक वृत्तींप्रमाणे शरीराला प्रवृत्त करतात हेच खरे; परंतु हे पंचभौत्तिक अस्तित्व आणि त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण संघटनातून निर्माण झालेले जीवस्वरूप, हा पार्थिव आविष्कार, ही देखील त्या स्वसंवेद्य आत्मरूपाचीच, तात्कालिक स्वरूपातील लीला असते. ही लीला म्हणजे देहाचे सर्व प्रकारचे वर्तन आणि विभ्रम होत. हे वर्तन आणि विभ्रम मात्र जिवंत असतानाच घडतात. याचा स्पष्ट अर्थ असा की या पार्थिवात स्वसंवेद्य आत्मरूप अशा अनंताचा संचार जोपर्यंत आहे; तोपर्यंतच हे वर्तन किंवा विभ्रम घडतात. म्हणूनच देहाचे हे वर्तन आणि विभ्रम पार्थिव देह आणि आत्मरूप यांच्या अद्वैताने घडत असतात, असा जीवाच्या ठिकाणी शिव अर्थात जीवात्मा अर्थात स्वसंवेद्य आत्मरूपाचा समत्वयोग घडलेला असतो. म्हणजेच जीव शिव अद्वैत योग घडलेला असतो. याची संवेदना जाणवते ती मनाला.

देहाच्या ठिकाणी आत्माराम अर्थात जीवाच्या ठिकाणी शिव हा मनोस्वरूपाने प्रकटलेला असतो. परंतु आत्मरूपाची स्वसंवेद्यता अर्थात मन; मनस्वीपणाने विविध आकार अर्थात रूपे धारण करते; तसेच अंतरी संचारलेला आत्मा मनोस्वरूपाने, देहाच्या अर्थात पार्थिवाच्या, तात्कालिक अशा स्वाभाविक वृत्ती प्रवृत्तीमध्ये मग्न होतो. म्हणजेच मन वासनादेहाच्या वासनाभावनांमध्येच स्वतःला हरवून बसते. त्यामुळे मन मनोस्वरूपापासून दूर भटकते. जीवनातील सुखदुःखालाच जीवन समजू



लागते. अशा मनाचे खरे मनोस्वरूप म्हणजे आत्मरूप असते.

माऊली श्री संत ज्ञानेश्वर महाराज सांगतात 'दुर्गमा'मध्ये मन घालू नका हे 'दुर्गम' म्हणजे वेदशास्त्रपुराणे यांची क्लिष्ट धर्मकर्ममीमांसात्मक अशी चर्चा आणि वासनादेहाला असलेल्या वासनाभावना विकार या गोष्टी होत. हे 'दुर्गम' बाजूला सारून मन 'हरि' भजनात लावावे. म्हणजेच प्रपंचव्यवहार धर्मकर्ममीमांसेनुसार, देहाच्या योगाने अनुसरतांना मनाने सतत मनोस्वरूपाचे अर्थात स्वसंवेद्य आत्मरूपाचे अर्थात 'हरि'चे स्मरण करावे. म्हणजे आपसुकच धर्मकर्ममीमांसेनुसार देहाद्वारे व्यवहारात घडणारे कर्म ज्ञानवान कर्म होऊन प्रकटेल.

माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज स्पष्टपणे पाठात निरुपित करतात, की 'हरि'चे 'वैकुंठ' अंतरंगातच आहे. वैकुंठ म्हणजे 'हरि'चे निवासस्थान, आणि 'हरि' म्हणजे अंतरात्मा हा जीवाच्याच ठिकाणी अद्वैतभावाने स्थित आहे. कारण तो या अखिल विश्वात, चराचरात, घनदाटपणे भरून आहे. म्हणजे अणुरेणुत ते स्वसंवेद्य आत्मरूप आहे. याचाच अर्थ ते 'मानव' या रूपाच्या ठिकाणीही आहेच. म्हणजेच सतत अंतरात्म्याची नामस्मरणाने आठवण करीत राहिलो तर; म्हणजे नामभक्ती अनुसरली तर; देह हेच वैकुंठ आणि देहाची चैतन्यशीला हेच आत्मरूप, असे ज्ञान होऊन; जीव आणि शिव यांचे अद्वैत अनुभवास येईल आणि करुणापूर्ण कर्म घडेल. निष्काम कर्म होईल. अभंगाच्या या चवथ्या आणि शेवटच्या चरणात भक्ती-ज्ञान-वैराग्य अर्थात अनंतपुण्यमयता अर्थात केवलानंद प्राप्तीची प्रक्रिया माऊलींनी उलगडून सांगितली आहे.

## (३)

तिसऱ्या अभंगामध्ये हरि, राम, कृष्ण आदि नावांनी लौकिकात ओळखल्या जाणाऱ्या सगुण स्वरूपाचे स्वरूप माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज स्पष्ट करतात. अवघे चराचर हा तन्मय अर्थात त्या स्वरूपाचाच अर्थात आद्य स्वसंवेद्य आत्मरूपाचेच आविष्काररूप आहे. जे जाणूनच

सर्व चराचर त्या 'हरिसी भजें' असा अनुभव येतो. माऊली म्हणतात,

**त्रिगुण असार निर्गुण हें सार । सारासार विचार हरिपाठ ।।१।।**
**सगुण निर्गुण गुणाचें अगुण । हरीवीण मन व्यर्थ जाय ।।२।।**
**अव्यक्त निराकार नाहीं त्या आकार । जेथुनि चराचर हरिसी भजें ।।३।।**
**ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं । अनंत जन्मांनी पुण्य होय ।।४।।**

हे विश्व निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापी अशा आद्य स्वसंवेद्य आत्मरूप, अनंत श्रीकृष्णांचा अर्थात शिवतत्त्वाचाच आविष्कार आहे. विश्वातील हा त्रिगुणात्मक अर्थात सत्व, रज आणि तम गुणात्मक असा सगुण आविष्कार तात्कालिक स्वरूपाचा, अर्थात सतत परिवर्तनशील, बदलता, क्षणभंगुर अर्थात मर्त्य, आभासात्मक आहे. भूलोकावर जन्मलेले प्रत्येक सगुण, अर्थात त्रिगुणात्मक रूप, हे असे तात्कालिक अर्थात आभासात्मक आहे. स्वप्नातील रूप असावे तसे हे रूप आहे. तरीदेखील ते त्या अनंत, अविनाशी निर्गुण अशा स्वसंवेद्य आत्मरूपाचेच रूप असल्याने; ते परिवर्तनात्मक रूपधारणा प्रक्रियेने, त्या परब्रह्म, परमात्मा अशा आत्मरूपाप्रमाणेच अविनाशी आहे.

म्हणजेच जे सगुण रूप वर्तमानात दिसते आहे ते केवळ असार अर्थात निरर्थक तथा आभास आहे; हे लक्षात घेऊन; त्यातील अविनाशी तत्त्व म्हणजे निर्गुण असे अनंत, 'हरि' स्वरूप हेच शाश्वत आहे. ते शाश्वत, चिरंतन, अविनाशी असे स्वरूप हेच आपल्या ठायीचे खरे अर्थात सत्य असे रूप होय. हरिपाठातून हा सारासार विचार आपणापुढे ठेवला आहे. असे प्रथम चरणात माऊलींनी प्रतिपादिले आहे.

दुसऱ्या चरणात माऊली म्हणतात सगुण, निर्गुण आणि अगुण ही चर्चा करत बसणे व्यर्थ होय. मनाच्या ठायी हरिचे स्मरण होण्यानेच सार्थक होईल. ते निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापी, महाशून्य, अविनाशी, अनंत असे ते आद्य स्वसंवेद्य आत्मरूप अर्थात परमात्मा स्वरूप आहे. सच्चिदानंद स्वरूप, आद्य, केवळ, श्रीकृष्ण, अनंत, अविनाशी, परमेश्वर अव्यक्त निराकार, आकार अर्थात रूप नसलेला असा असतांनाही; त्याच्यापासूनच हे चराचर निर्माण झाले. त्याच्या स्वसंवेद्यतेची ही लीला आहे. हा चिद्विलास आहे.

हे चराचराला मनाच्या ठायी जाणवते. म्हणूनच हे चराचर सतत त्या 'हरि'चे भजन करते. हरि स्वरूप अनुभवण्याची आस चराचराला असते. असे तिसऱ्या चरणात सांगून; माऊली श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ज्ञानदेवांच्या ध्यानीमनी अर्थात अंतरंगाचे ठिकाणी सतत 'राम, कृष्ण' या आत्मरूप 'हरि' स्वरूपाचे स्मरण असते. अंतरंग हरिस्वरूपच असल्याचे निरंतर जाणवते. ही सच्चिदानंद स्वरूपावस्था केवळ अनंत जन्मांच्या पुण्याचे अर्थात नामस्मरणाचे अर्थात ठायीच्या जीवात्म्याच्या स्वरूप स्थितीच्या स्मरणपूर्वक कर्तव्यतत्पर कर्मशैलीचेच फल होय. अशी अवस्था 'हरि मुखे म्हणा ।' म्हणजे प्रत्येकाला प्राप्त होईल असे संत श्री ज्ञानेश्वर महाराजांना वाटते.

## (४)

चवथ्या अभंगात निस्सीम आणि अनन्य भक्तिसाधनेची आवश्यकता माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराजांनी जनसामान्य संसारप्रापंचिकांना समजावून सांगितली आहे.

**भावेंवीण भक्ति भक्तिवीण मुक्ति । बळेवीण शक्ति बोलूं नये ।।१।।**
**कैसेनि दैवत प्रसन्न त्वरित । उगा राहें निवांत शिणसीं वाया ।।२।।**
**सायास करिसी प्रपंचदिननिशीं । हरिसी न भजसी कोण्या गुणें ।।३।।**
**ज्ञानदेव म्हणें हरि जप करणें । तुटेल धरणें प्रपंचाचे ।।४।।**

अभंगाच्या पहिल्या चरणात माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज बळ

आणि शक्ति यांच्या परस्पर अविलंबित्वाचे प्रमाण देतात. बळ म्हणजे शरीराची सुदृढता होय. शरीर सुदृढ नसेल तर; शक्तीच्या सामर्थ्याविषयी बोलणे व्यर्थ होय. तसे मन वासनादेहाच्या वासनाभावनात गुंतले तर अंतरीच्या आत्मारामाचा अर्थात जीवात्म्याचा अर्थात चैतन्याचा अर्थात परमात्मतत्त्वाची संवेदना मनाच्या ठिकाणी कशी होणार? म्हणून प्रयत्नपूर्वक वासनादेहाची वासनाभावनायुक्त संसारप्रपंचातील गुंतवणूक; देहाचा व्यवहारच मुळात त्या अंतरात्म्यामुळे म्हणजे परमतत्त्वामुळे होते, याकडे मन वेधणे आवश्यक आहे.

वास्तविक मन ही जाणीवच त्या परमतत्त्वाच्या अर्थात 'हरि'च्या अस्तित्वाची प्रकट स्वसंवेद्यता आहे. म्हणजे संसारप्रपंचातील आसक्ती प्रयत्नपूर्वक बाजूला साधून मनात 'हरि'स्मरण झाले पाहिजे.

मनाचे ठिकाणी स्वरूपाचे अर्थात 'हरि'चे स्मरण होणे म्हणजेच मनोस्वरूप प्रकटणे होय. असे मनोस्वरूप होणे म्हणजेच मनात भाव दाटणे, अर्थात 'हरि', विठ्ठल, श्रीकृष्ण, शिव इ. नावांनी ओळखल्या जाणाऱ्या तत्त्वाविषयीची सत्यता अनुभवास येणे होय.

हे सत्य स्वरूप अवगत झाले तरच त्याविषयी प्रेम निर्माण होते. असे सत्य प्रेम जाणवणे म्हणजेच भक्ती होय. भक्ती म्हणजेच प्रेम. भक्ती प्रेमस्वरूपा असते. अशी प्रेमस्वरूपता येणे म्हणजेच संसारप्रपंचाविषयीचे असारत्व ज्ञात होणे. ह्या असारत्वाचे ज्ञान झाले की; त्या ज्ञानासह कर्म घडू लागते. ज्ञानवान कर्मशीलता म्हणजेच निष्काम कर्मपरता होय. अशी निष्काम कर्मशैली म्हणजेच मुक्तीची अनुभूती होय. म्हणजेच सत्यविषयक प्रेमभावाशिवाय भक्ती शक्य नाही. अर्थातच भक्तीशिवाय मुक्ती शक्य नाही. मग भावभक्तीशिवाय मुक्तीची चर्चा करणे म्हणजे बळ नसतांना शक्तिसामर्थ्याची चर्चा करणे होय.

दुसऱ्या चरणात या सूत्राच्या अनुषंगाने माऊली म्हणतात, भावभक्तीच नसेल तर ते दैवत अर्थात 'हरि' त्वरित कसे प्रसन्न होणार? असे दांभिकतेने देवाला भजण्यापेक्षा; उगा निवांत राहाणेच ठीक नव्हे का?

जसे पाच दिवसरात्र व्रतस्थपूर्वक अर्थात सायासपूर्वक अनुष्ठान मांडले; तर ते सायास करावे लागतात, यातच मन त्रस्त होणार. अर्थात कर्मकांड, सोवळेओवळे, विधिनिषेध यांच्या पालनातच मन व्यग्र होणार. मग 'हरि'कडे कोणत्या गुणांनी धाव घेणार? 'हरि'कडे जाण्यासाठी भक्तिभाव ह्या गुणाची आवश्यकता आहे. म्हणजेच सात्त्विक गुणाची आवश्यकता आहे. कर्मकांड सायासात तर मन रज आणि तमाच्या आधीन जाणार. असे झाले तर 'हरि' प्राप्तीचे प्रयत्नच व्यर्थ होत. केवळ दांभिकतेने आपण मोठे देवभक्त आहोत याच्या सोंगाची प्रतिष्ठा होईल. असे तिसऱ्या चरणात सांगितले आहे.

भाव निर्माण होऊन प्रेमस्वरूप भक्तीने 'हरि' रूप व्हायचे असेल तर मनाला, संसारप्रपंच आसक्तीपासून बाजूला करण्याचे वळण लावले पाहिजे. हे करण्यासाठीचा उपाय, चवथ्या चरणात माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज सांगतात. तो उपाय म्हणजे 'हरि' जप करणे होय. 'हरि' जप करीत राहिले तरच संसारप्रपंचातील गुंतणे तुटू शकेल. मनाला आत्मरूपाचे अर्थात हरिचे स्मरण होईल. मन मनोस्वरूप होईल. मनोस्वरूप स्थितीने निष्काम कर्म अर्थात संसारप्रपंचातील यातायात केवळ कर्तव्यतत्परतेने घडेल. म्हणजेच 'हरि' जपाने जीवनमुक्ततेची अनुभूती येईल.

## (५)

पाचव्या अभंगात माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज सद्गुरू, संत यांच्या संगतीची मात अर्थात मर्म समजावून सांगतात. माऊली म्हणतात–

**योग याग विधी येणें नोहे सिद्धी । वायांचि उपाधि दंभ धर्म ॥१॥**
**भावेवीण देव न कळे निःसंदेह । गुरुविण अनुभव कैंसा कळे ॥२॥**

**तपेवीण दैवत दिधल्याविण प्राप्त । गुजेंविण हित कोण सांगे ।।३।।**
**ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात । साधूंचे संगती तरणोपाय ।।४।।**

पहिल्या चरणात माऊली सांगतात– राजयोग अर्थात अष्टांग योग अर्थात समाधीसाधनायोग अर्थात ध्यानयोग आणि हटयोग, तसेच यज्ञयाग अर्थात विशिष्ट मुहूर्तापासून विशिष्ट कालावधीसाठी विशिष्ट तांत्रिक मांडणीसह आणि विधिविधानांसह करावयाची कर्मकांडात्म कर्मे, यांनी पूर्णतः जीवनमुक्तीची सिद्धी होत नाही अर्थात जीवनमुक्त होता येत नाही. दुसरे म्हणजे योगमार्ग हा शारीरदृष्ट्या अतिशय खडतर, क्लेशदायक असा मार्ग आहे. कारण त्यात यम, नियमांचे पालन करावे लागते. हटयोग हा तर तामसवृत्तीकडे घेऊन जाण्याची शक्यता असते. विविध प्रकारची तंत्रे शाक्त, शैव इ. आणि त्यांचे विशिष्ट विधिनिषेध सामान्य संसारप्रपंचातील माणसाला अतिशय कठीण होत. त्यामुळे चारीमुक्तींची सिद्धी घडत नाही.

येथे सिद्धी असे म्हणतांना माऊलींना अष्टसिद्धी इ.विषयी सांगावयाचे नाही. योग, याग, तप या मार्गात या अणिमा, लघीमा, महिमा आदि मुख्य व वाचासिद्धीसारख्या सिद्धी प्राप्त होतातच. त्याद्वारे विविध अलौकिक वाटतील असे, चमत्कार घडवून योगी, सिद्ध लौकिकात मिरवितांना दिसतात. याविषयी माऊली, येथे भाष्य करीत नाहीत. अशा सिद्धी या भक्तिमार्गातील मोठा अडथळा होय; असे जवळपास सर्व संतांनी स्पष्टपणे सांगितले आहे. माऊली सिद्धी हा शब्द ध्येय किंवा लक्ष्य या अर्थाने वापरतात. चारीमुक्तींचा अनुभव अगदी संसारप्रपंच करणारालाही घेता आला पाहिजे हे ध्येय किंवा लक्ष्य आहे.

माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज पहिल्या चरणात स्पष्टपणे बजावतात की योग, याग, विधी या मार्गाने चारीमुक्ती प्रपंचातही अनुभवता याव्यात, असे ध्येय साध्य होणार नाही. या मार्गाने गेलात तर भलत्याच, निरर्थक, अर्थात वाया, अशा उपाधी चिकटतील. उदा. महाराज, सिद्ध, बुवा इ. आणि वर्तनात स्वाभाविकपणे दांभिकता येईल. दंभधर्म म्हणजे दांभिकतेने म्हणजे नाटकीपणाने वागण्याचा धर्म अर्थात स्वभाव होऊन बसेल.

दुसऱ्या चरणात माऊली हरिपाठातील चवथ्या अभंगातील 'भावेंवीण भक्ति भक्तिवीण मुक्ति' या सूत्रातील आशय अधिक स्पष्टपणे सांगतात. भाव असल्याशिवाय देव अर्थात ठायीचे स्वरूप कळणारच नाही. यासाठी ही प्रक्रिया समजावून देणारा आणि अनुसार करवून घेणारा, गुरू लाभल्याशिवाय भाव–भक्ति–मुक्ति– अर्थात स्वरूप म्हणजेच देव ज्ञान प्रक्रिया कळणे केवळ अशक्य आहे.

याचा स्पष्ट अर्थ असा की भक्तियोग मार्गातही गुरू लाभणे आवश्यक आहे. जसे काही दिधल्यावीण काही प्राप्त होत नाही असे व्यावहारिक सूत्र आहे तसेच तपसाधना केल्याशिवाय दैवत कसे प्राप्त होईल; याचे ज्ञान सद्गुरू घडवितो. कारण गुरू साधकाशी गुज करतो आणि भक्ति–ज्ञान–वैराग्य अर्थात भावभक्ती – स्वरूपज्ञान – मुक्तीही प्रक्रिया समजावून सांगतो आणि अनुसारही करवून घेतो. सद्गुरूच्या ठिकाणी शिष्याविषयी अर्थात साधकाविषयी करुणा असते; म्हणूनच हे चारीमुक्ती प्राप्तीचे हितगुज घडते असे तिसऱ्या चरणात माऊली सांगतात.

चवथ्या चरणात माऊली 'दिल्याशिवाय मिळत नाही' या सूत्राच्या दृष्टांताची मात अर्थात मर्म समजावून सांगतात की; साधूंचे संगती, राहण्यासाठी, वेळ आणि अनन्य श्रद्धा दिल्याशिवाय साधूकडून हे भक्ती–मुक्तीचे गुज कसे कळणार? अर्थात 'हरि मुखे म्हणा' या सांगीतील मर्म सद्गुरूशिवाय कळणार नाही. सद्गुरू निवृत्तीनाथांच्या निरुपणानुसारच आपण गुज करीत आहोत; हे संत श्री ज्ञानेश्वर महाराज सूचित करतात. ते म्हणतात– साधूचे संगतीच केवळ तरुन जाण्याचा म्हणजे प्रपंचात राहून जीवनमुक्तता अनुभवण्याचा उपाय सापडतो. त्यासाठी सत्संग करणे आवश्यक आहे.

## (६)

सहाव्या अभंगात 'हरिभक्त' कोणत्या प्रकारे साधुबोधाच्या म्हणजे 'ज्ञानी' अवस्थेला पोचतो. असा साधुबोधी अर्थात ज्ञानी पुरुष केवळ लोककल्याणार्थाचाच विचार करतो हे ज्ञानमय अवस्थेचे मर्म उलगडून दाखवतात–

**साधुबोध झाला तो नुरोनियां ठेला । ठायींच मुराला अनुभव ।।१।।**
**कापुराची वाती उजळली ज्योति । ठायींच समाप्ती झाली जैसी ।।२।।**
**मोक्षरेखे आला भाग्यें विनटला । साधूंचा अंकिला हरिभक्त ।।३।।**
**ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनीं । हरि दिसे जनीं आत्मतत्त्वीं ।।४।।**

अभंगाच्या पहिल्या चरणात माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज, साधुबोध अर्थात आत्मरूपाचा बोध ठायीच झाला की तो 'नुरेचि' म्हणजे तो लौकिक अर्थाने अर्थात प्रपंचसंसारातील प्रसिद्ध अशा ओळखीने केवळ वावरत असतो. मात्र त्या ओळखीचा त्याच्या ठायीचा अहंकार पूर्णतः नाहिसा झालेला असतो. त्याचे विभूतिमत्त्व निष्काम कर्मयोगानेच कार्यरत असलेले दिसते. असा तो, नसून आहे; असा होतो. याचे कारण त्या ठायी ठायीच्या स्वरूपाचा बोध झाल्याने तो बोधच त्याच्या ठायी स्वभावतः मुरलेला दिसतो. म्हणजेच तो लौकिकदृष्ट्या नाव गाव व्यवसायाने दिसत असला; तरी तो आत्मानंदात अर्थात स्वरूपस्थितीत मग्न असतो. म्हणजेच जीवनात असूनही जीवनमुक्त असतो.

या त्याच्या जीवनमुक्त अवस्थेचे वर्णन करतांना माऊली कापुराच्या वातीचा दृष्टांत देतात. कापुराची वात जळलेली तरी राखेच्या रूपाने दिसते. कापराची वात केली तर ज्योत तर दिसते परंतु ती ज्योत उजळल्यानंतर त्या ज्योतीतील कापुराचे पार्थिव रूपही दिसत नाही. हे पार्थिव रूप म्हणजे अहंकार होय. लौकिकात या अहंकाराचीच प्रसिद्धी असते. त्या अहंकाररूपी कीर्तीने उरावे, अशी आसही असते. मात्र ज्याला प्रत्यक्ष सत्य अशा निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापी, अनंत, श्रीकृष्ण अशा केवल आद्य स्वसंवेद्य आत्मरूपाचा, ठायीच्या जीवात्म्याचे ठिकाणी स्वरूपबोध घडला; अशा मनोस्वरूप झालेल्या देहाला, लौकिक अहंकारी व्यक्तित्त्वाचे, काहीच महत्त्व नसते. तो देहीच विदेही होऊन; स्वरूपस्थितीत असतो. म्हणजेच ठायीच सायुज्यमुक्तीचा अनुभव घेत असतो. कापुराच्या ज्योतीचे लौकिक रूप ठायीच संपून जाते, तसे साधुबोध झालेली व्यक्ती जीवनमुक्त असते.

तिसऱ्या चरणात माऊली म्हणतात, मोक्षरेखेवर आलेल्या अर्थात स्वरूपस्थितीला अर्थात ज्ञान अवस्थेस गेलेल्या माणसालाच असे जीवनम ुक्तीचे भाग्य लाभते. परंतु हे भाग्य जीवनमुक्त अशा अर्थात साधुस्वरूप अशा सद्गुरूंच्याच सान्निध्यात घडते म्हणजे जो गुरुकृपेने 'हरि'भक्तीची साधना करीत असतो, म्हणजेच साधूंच्या अंकित राहून भक्ती करीत असतो; त्यालाच असे स्वरूपचे ज्ञान होते. तोच मनोस्वरूपस्थितीने जीवनात जीवनमुक्तपणे व्यवहार करू शकतो.

सज्जनांच्या अर्थात सत्यस्वरूप जाणणाऱ्यांच्या संगतीत राहाण्याची गोडी, अर्थात आवड ज्याच्या ठायी निर्माण होते; त्यालाच अर्थात सलोक, समीप होऊन सरूप होणाऱ्यालाच सायुज्यमुक्तीची, अर्थात सर्व जनांत तेच आत्मतत्त्व असल्याची, अनुभूती येते. म्हणजेच अशीच व्यक्ती स्वतःसह सर्वाभूती आत्मतत्त्वाचा बोध घेऊन; स्वरूपस्थिती अनुभवू शकते; असे चवथ्या चरणात संत श्री ज्ञानेश्वर महाराज स्पष्ट करतात.

## (७)

सातव्या अभंगात अभक्ताची गती, माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज स्पष्ट करून सांगतात. वास्तविक त्याच्याही ठायी तेच आद्य स्वसंवेद्य आत्मरूप जीवात्मा स्वरूपात, वास्तव्याला असते. त्यामुळेच तो जिवंतपण अनुभवत असतो. तथापि त्यांच्या स्वसंवेद्यतेला म्हणजे

मनाला ठायीच्या आत्मरूपाचा विसर पडतो. माऊली म्हणतात-

**पर्वताप्रमाणें पातक करणें । वज्रलेप होणे अभक्तांसी ।।१।।**
**नाहीं ज्यांसी भक्ति तो पतित अभक्त । हरिसी न भजत दैव हत ।।२।।**
**अनंत वाचाळ बरळती बरळ । त्यां कैसा दयाळ पावे हरि ।।३।।**
**ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान । सर्वांघटी पूर्ण एक नांदे ।।४।।**

अभंगाच्या पहिल्या चरणात अभक्तांच्या वृत्तीविषयी माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज स्पष्ट विधान करतात. पर्वताएवढे पातक करणे आणि तोच आपला विजय आहे, म्हणून मिरविणे; हे अभक्तांकडून होणारच. ही गोष्ट वज्रलेपासारखी अटळ आणि अनिवार्य होय.

दुसऱ्या चरणात अभक्ताची जणू व्याख्याच माऊली देतात. ज्याच्या ठिकाणी भक्ती नाही तो अभक्त होय. भक्ती नसल्यामुळे तो पापच करणार; त्या कारणाने तो पतितच असणार हेही वज्रलिखितच होय. खरोखरीज 'हरि' भजावा हे ज्यांना कळत नाही; त्यांचा मानव जन्मात येऊन काय उपयोग? ते खरोखरी दैवहत अर्थात दुर्दैवीच होत.

असे अभक्त पापी अतीव अहंकारवशतेने अनंत अर्थात अमर्याद वाचाळपणा करतात, अर्थात बढाया मारतात. जग मुठीत घेण्याचेही बरळतात. हे त्यांचे केवळ 'बरळ' अर्थात व्यर्थ बडबड असते. ते अज्ञानवशतेने बोलत असतात. अशा अहंकारी पाप्यांवर तो दीनदयाळ हरि कसा प्रसन्न होणार? देव अशांना पावत नाही.

अशा अभक्तांनाही मुक्ती मिळावी यासाठी माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज प्रबोध करतात. माऊली म्हणतात, सर्वांघटी अर्थात सर्व सगुणरूपांच्या ठिकाणी अर्थात सर्व भूतमात्रांमध्ये पूर्णपणे तो आत्माच नांदत आहे, हे त्याचे निधान आहे. हे भूतमात्रांच्या जिवंतपणे घडणाऱ्या व्यवहाराच्या प्रमाणाने सिद्धच आहे. हे लक्षात घ्यावे.

त्याचे निधान आहे अर्थात देहाच्या ठिकाणी तो जीवात्मा स्वरूपाने नांदत आहे तोवरच देहाहंकार असू शकेल, अन्यथा वासनादेहाचे असणे केवळ आभास आहे. म्हणूनच त्या वासनादेहाने आत्म्याची स्वसंवेद्यता स्वरूप असलेल्या मनाला, वासना देहाच्या ठिकाणी गुंतवून ठेवू नये. तर 'हरि' जपाने मनाला ठायीच्या आत्मस्वरूपाचे स्मरण घडवावे म्हणजे आपसूकच पापवृत्ती गळून पडेल. त्या हरिभजनाने अशा अभक्ताचेही परिवर्तन होऊन भक्त प्रकटेल. भक्त प्रकटला की 'हरि' जपामुळे चारी मुक्तींना सन्मुख होईल.

माणूस पापी, दुष्ट, शोषक असा नसतो. वासनादेहाच्या विकारी स्वभावामुळे त्याच्यातील स्वसंवेद्य मनोस्वरूपालाही बाधितता येते. ती बाधितता, ठायीच्या आत्मनिधानाच्या स्मरणाने, वासनाविकारांपासून तो अलिप्त होऊन; नाहीशी होऊ लागेल. पसायदानातील 'जे खळांची व्यंकटी सांडो' ही प्रार्थना, याच आशयाची आहे. सद्गुरू अपार करुणेने, पतित अन्यायी अशा अभक्तालाही जवळ घेऊन प्रबोध करतात.

## (८)

आठव्या अभंगामध्ये 'हरि' नामभक्तीचा महिमा माऊली श्री ज्ञानेश्वर महाराज प्रबोधित करतात.

**संतांचे संगती मनोमार्गगती । आकळावा श्रीपती येणें पंथे ।।१।।**
**रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा । आत्मा जो शिवाचा राम जप ।।२।।**
**एकतत्त्व नाम साधिती साधन । द्वैताचें बंधन न बाधिजे ।।३।।**
**नामामृत गोडी वैष्णवां लाधली । योगियां साधली जीवनकळा ।।४।।**
**सत्वर उच्चार प्रल्हादीं बिंबला । उद्धवा लाधला कृष्णदाता ।।५।।**
**ज्ञानदेव म्हणे नाम हें सुलभ । सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे ।।६।।**

भागवत संप्रदाय अर्थात वैष्णव तथा वारकरी संप्रदायातील संतांच्या संगती, 'हरि' भजन घडविते. अर्थात मनाच्या ठिकाणी 'हरि' स्मरण

घडविते. मनाला ठायीच्या जीवात्म्याच्या स्वरूपाची ओढ लागते. मनोमार्ग गतीने अर्थात मनाच्या उत्कट भक्तिभावाने मनच स्वरूप स्थितीस सिद्ध होते. अर्थात वासनादेहाच्या विकारवशतेमुळे स्वतःच स्वतःच्या ठायी असलेल्या आत्मरूपापासून दूर गेलेल्या मनाला ठायीच्या आत्मस्वरूपाची प्रतिती येते. हीच प्रक्रिया या भक्तिमार्गात अर्थात पंथात घडावी अशी अपेक्षा हरि आकळावा असे म्हणून; माऊलींनी अभंगाच्या प्रथम चरणात व्यक्त केली आहे.

वाचेने रामकृष्ण भजन करता करता तो जीवाचा भाव व्हावा अर्थात मनोस्वरूप स्थिती निर्माण व्हावी आणि आत्मस्वरूप अशा मनोस्वरूपाने घडणारा जप हा, शिवतत्त्वाचा अर्थात अनंत, अविनाशी, सत्य, केवळ, आद्य, स्वसंवेद्य आत्मरूपाचा राम जप व्हावा. नाम, भक्त आणि हरि हे स्वरूप होऊन प्रकटावे, अद्वैत घडावे. असा भक्तियोग साधावा अशी अपेक्षा दुसऱ्या चरणात माऊली व्यक्त करतात.

नामस्मरण या साधनाने एकतत्त्व स्वरूपात म्हणजे अनन्यपणाने साधना घडू लागली की; वासनादेह अहंकार आणि जीवात्मा हे द्वैत आपसूक गळून पडेल. नाम जपाच्या स्वाभाविकतेने देहाला भक्तीचे वळण लागेल आणि देह आणि जीवात्मा यांचे अद्वैत प्रकटेल. ही प्रक्रिया भक्तिसाधनेने घडते. ही भक्तिसाधनेची शक्ती प्रतिपादन करीत; माऊली अभंगाच्या तिसऱ्या चरणात नामभक्तीने द्वैताच्या बंधनाची बाधा, अद्वैत घडण्यामध्ये येणार नाही अशी ग्वाही देतात.

नाम हेच अमृत आहे. अमृत, अविनाशी असे आत्मरूप स्वरूपात विनाशी देहाला जीवनमुक्त करते. अमृत विकार नाहिसा करून; सात्त्विकभाव जागविते. नाम याच अमृत प्राशनाची गोडी वैष्णवांना अर्थात भक्तियोग साधणाऱ्यांना लागली असल्यामुळे; योग्यांना जीवनकळा प्राप्त झाली. योग्यांचे जीवन अद्वैत साधना करीत असते. ती अद्वैत स्थिती नामामृताच्या छंदामुळे योग्यांना प्राप्त होते, असे माऊली चवथ्या चरणात स्पष्ट करतात.



पाचव्या चरणात भक्तियोगाने चारी मुक्ती कशा साधल्या जातात अर्थात अद्वैत स्थिती कशी येते हे माऊली प्रल्हाद आणि उद्धव यांचे प्रमाण देऊन सांगतात. ते म्हणतात शैशवावस्थेतच अर्थात सत्वरच प्रल्हादाच्या वाणीला नामोच्चाराचा साक्षात्कार घडला. नामभक्ति मनाचे ठायी बिंबली; तसेच उद्धवाला कृष्ण नामभक्तीची गोडी लागली; म्हणूनच भक्त प्रल्हाद श्री विष्णूस्वरूप झाले. उद्धवांना श्रीकृष्ण लाधले. अर्थात श्रीकृष्णस्वरूप होता आले.

या दृष्टीने नामभक्तीचे महत्त्व आणि सहजता स्पष्ट करतांना माऊली शेवटच्या अर्थात सहाव्या चरणात म्हणतात नाम घेणे हे सर्वत्रच एवढे सुलभ आहे की ते नाम दुर्लभ आहे म्हणणारा, सर्वत्र शोधूनही सापडणे दुर्लभ आहे अर्थात सापडणार नाही.

## (९)

नाम घेणे अगदी सहज असूनही, जो नामाचे महत्त्व जाणत नाही म्हणजे रामकृष्णहरि नाम जप करीत नाही; त्याचे जीवन व्यर्थ होय, असे माऊली नवव्या अभंगात निकराने प्रतिपादन करतात.

**विष्णूवीण जप व्यर्थ त्यांचे ज्ञान । रामकृष्णीं मन नाहीं ज्याचे ।।१।।**
**उपजोनी करंटा नेणें अद्वैत वाटा । रामकृष्णीं पैठा कैसेनी होये ।।२।।**
**द्वैताची झाडणी गुरुवीण ज्ञान । त्या कैंचे कीर्तन घडे नामीं ।।३।।**
**ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान । नामपाठ मौन प्रपंचाचे ।।४।।**

भगवान श्री विष्णूंचा जप अर्थात 'हरि' जप करण्याचे टाळून जे जप करतात, अर्थात अन्य प्रकारे जप करतात, त्यांचे ज्ञान व्यर्थ होय. म्हणजेच ते अज्ञानीच म्हणावे लागतील. राम, कृष्ण, हरि अर्थात निर्गुण, निराकार, निर्विकार, सर्वव्यापी, सार्वकालिक, महाशून्य, अविनाशी, अनंत, श्रीकृष्ण असे आद्य स्वसंवेद्य आत्मरूप, जे 'हरि'

नावाने आपण ओळखतो; तेच चराचराच्या अर्थात भूतमात्रांच्या ठायी, भूतमात्रांच्या रूपाने, नटले आहे म्हणजे माणूस रूपातही तेच स्वसंवेद्य आत्मरूप स्थित आहे. त्याचे स्मरण स्वसंवेद्य स्वरूपातील मनाला करून देण्यासाठी जप करण्याचा उपाय होय. अर्थात श्री विष्णूंच्या नामजपाने मन मनोस्वरूप स्थितीला जाईल आणि ठायीच चारीमुक्तींचा अनुभव घेता येईल. त्यासाठीच रामकृष्णांच्या ठायी, जपा द्वारा, मन गुंतविले पाहिजे. अन्यथा ज्ञान व्यर्थ होय असे माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज प्रथम चरणात स्पष्ट करतात.

नरजन्म हा पूर्ण विकसित असे जीवरूप होय. असा नरजन्म प्राप्त होऊन; अद्वैत अनुभूती घेण्याची क्षमता असूनही जो अद्वैताच्या वाटेने, 'हरि' जप करण्याची साधना करीत नाही. त्याला रामकृष्णांच्या ठिकाणी अर्थात आद्य स्वसंवेद्य आत्मरूपाच्या ठिकाणी एकरूप कसे होता येणार? हे सांगण्यासाठी; पत असल्याशिवाय बाजारपेठेत स्थान आणि यश मिळत नाही; असे प्रमाण देऊन माऊली म्हणतात, जो 'हरि' नामभक्तीच्या अद्वैताकडे नेणाऱ्या वाटेने जातच नाही त्याला विष्णूलोक अर्थात वैकुंठप्राप्ती अर्थात ठायीच मनोस्वरूप स्थिती कशी अनुभवता येणार. त्याला अद्वैताच्या पेठे पैठा मिळणार नाही अशा शब्दात विष्णूजपाला पारखा असलेल्या माणसाची कानउघाडणी माऊली दुसऱ्या चरणात करतात.

श्री गुरुवीण द्वैताची झाडणी अर्थात द्वैत नाहीसे करण्याचे; अर्थात मनोस्वरूप होऊन जीवात्म्याचे ठिकाणीच, स्वसंवेद्य आत्मरूपाशी स्वरूपस्थिती अनुभवण्याचे ज्ञान मिळणार नाही. मग त्याच्या वाट्याला नामसंकीर्तनातील आनंदानुभूती तरी कशी येणार? त्याच्याने नामसंकीर्तन घडणार नाही. संसारप्रपंचातील गुंतवणुकीमुळे, जीवात्मा आणि जीव अर्थात आत्मरूप आणि शरीर यामध्ये द्वैतभाव निर्माण होतो तो घालविण्याचा उपाय सद्गुरूच सांगू शकतो. अर्थात सद्गुरू 'हरि' नामजपाचा उपदेश करून; द्वैताची झाडणी करण्याचे मार्गदर्शन करतो.



त्यासाठी सद्गुरूशी शरण गेले पाहिजे; असे माऊली तिसऱ्या चरणात उलगडून सांगतात.

श्री विठ्ठलाचे हे सगुण ध्यान 'हरि' जपाने अर्थात नामपाठाने घेण्याचा स्वभाव झाला की प्रपंचाची यातायात आपोआप मौन होते. प्रपंचाची आसक्ती नाहीशी होऊन ठायीच विठ्ठलस्वरूपाची अनुभूती येते. म्हणजेच नामभक्तीने मनोस्वरूप स्थिती प्राप्त होऊन; देही विदेही होऊन प्रपंचात परमार्थाची अनुभूती घडते असे चवथ्या व शेवटच्या चरणात माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज समजावून सांगत आहेत.

अशा नऊ अभंगांच्या पाठानंतर 'रामकृष्णहरी ।। जयजय राम कृष्णहरी ।' असे नामस्मरण करण्याची प्रथा आहे.

## (१०)

दहाव्या अभंगात माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज नाममहिमा सांगत आहेत.

**त्रिवेणीसंगमी नाना तीर्थे भ्रमी । चित्त नाहीं नामीं तरी ते व्यर्थ ।।१।।**
**नामासी विन्मुख तो नर पापिया । हरीवीण धावया न पावे कोणी ।।२।।**
**पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मिक । नामे तिन्हीं लोक उद्धरती ।।३।।**
**ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरीचें । परंपरा त्याचें कुळ शुद्ध ।।४।।**

पुण्यसंचय व्हावा. उद्धार व्हावा. सुख लाभावे. अरिष्टे नष्ट व्हावीत. त्रिताप मुक्त व्हावे यासाठी; त्रिवेणी संगम प्रयाग, सारखी अनेक तीर्थे माणूस हिंडतो. हे करतांना जर चित्त नामस्मरणात नसेल; तर त्या तीर्थयात्रा व्यर्थ होत. त्यातून कोणताही पुण्यसंचय होणार नाही. उद्धार तर दूरच, असे माऊली पहिल्या चरणात सांगतात.

ज्याच्या मुखी नामजप नाही, असा नर अर्थात व्यक्ती पापीच म्हणावा लागतो. निदान एवढे लक्षात ठेवले पाहिजे. एका हरि खेरीज

त्रितापयुक्त संसारप्रपंचात सहाय्यार्थ कोणीही धावून येऊन पावणार नाही, सहाय्य करणार नाही, असे माऊली दुसऱ्या चरणात स्पष्ट बजावतात.

नामजपाने तीनही लोक अर्थात स्वर्ग, मृत्यू, पाताळ अर्थात सत्त्व, रज आणि तम वृत्तीच्या लोकातून उद्धार होतो. याला प्रमाण म्हणजे, भगवान सद्गुरू नारदांच्या निरुपणाने, नामजप करणाऱ्या वाल्याचा वाल्मिकी झाला हे पुराणात प्रसिद्ध आहे.

म्हणूनच चवथ्या चरणात माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, हरिनामाचा जप करा. असा जप केल्याने अवघे कुळ शुद्ध होते असा परंपरागत अनुभव आहे.

### (११)

दहाव्या अभंगाप्रमाणेच अकराव्या अभंगातही नामजपाचा महिमा ठासून सांगितला आहे –

**हरि उच्चारणी अनंत पापराशी । जातील लयाशी क्षणमात्रें ।।१।।**
**तृण अग्निमेळें समरस झालें । तैसें नामें केलें जपतां हरि ।।२।।**
**हरि उच्चारण मंत्र हा अगाध । पळे भूतबाधा भय तेथें ।।३।।**
**ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ । न करवे अर्थ उपनिषदी ।।४।।**

अभंगाच्या पहिल्या चरणात; केवळ 'हरि' नामोच्चाराने अर्थात जपाने, क्षणमात्रात, अनंत पापराशी लयाला जातील असे माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज ठामपणे आश्वासित करतात.

ही ग्वाही देतांना माऊली थेट वेदांतील प्रमाण देतात. जसे तृण अर्थात गवत अग्नीत टाकले की ते अग्नीच होते. अर्थात समरस होते. त्यातील तृण स्वभाव नाहीसा होतो; त्याप्रमाणे हरिनाम जपाने पापराशी तृणवत जळून जातील.

नाममहिमा अधिक स्पष्ट करतांना, माऊली तिसऱ्या चरणात म्हणतात 'हरि'नाम मंत्राचे सामर्थ्य एवढे अगाध आहे की; 'हरि'नाम मंत्राच्या उच्चारणाने, भूतबाधेचे भय पळून जाते.

चवथ्या चरणात 'हरि' अर्थात स्वरूप अर्थात निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापी अनंत, राम, कृष्ण, महाशून्य, अविनाशी अर्थात आद्य, स्वसंवेद्य आत्मरूप अशा जीवात्मा स्वरूपाचे, अर्थात ठायीच हरिस्वरूप झाल्याने, त्या स्वरूपाची सर्वसमर्थता ठायीच अनुभूत होते. या हरिस्वरूप सामर्थ्याचा अर्थ सांगतांना उपनिषदांनाही, 'न करवे' अशी स्थिती झाली अर्थात उपनिषदेही थकून गेली.

### (१२)

हरिस्वरूपाचे आकलन केवळ सद्गुरू कृपेनेच होऊ शकते. सद्गुरू कृपेनेच साधकाच्या ठायी स्वरूपसिद्धीचा अर्थात हरिप्राप्तीचा भाव प्रकट होतो. तो भाव प्रकटला तरच भक्तिसाधना सिद्ध होते. अन्यथा 'हरि' आत्मसात होणे, हरिस्वरूप होणे अशक्य होय. हे बाराव्या अभंगात माऊलींनी परोपरीने पटवून दिले आहे.

**तीर्थ व्रत नेम भावेंविण सिद्धी । वायांचि उपाधि करिसी जना ।।१।।**
**भावबळें आकळें येरवी नाकळें । करतळीं आवळे तैसा हरि ।।२।।**
**पारियाचा रवा घेतां भूमीवरीं । यत्न परोपरी साधन तैसे ।।३।।**
**ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण । दिधलें संपूर्ण माझे हातीं ।।४।।**

मनात भाव नसेल तर, तीर्थ, व्रते, नेमधर्म आदि कर्मकांड व्यर्थ होय. त्याने अपेक्षित सिद्धी घडणार नाही. ते कर्मकांड म्हणजे व्यर्थ उपाधी अर्थात लचांड लागल्यासारखे वाटेल. अर्थात लोकांमध्ये केवळ दांभिकतेने धार्मिक म्हणून मिरविणे होईल, असे अभंगाच्या पहिल्या चरणात सांगतात. दुसऱ्या चरणात महाराज दृष्टांत देतात. 'हरि'स्वरूपाचा अनुभव भावबळानेच प्राप्त होतो अर्थात उत्कट, अनन्य अशा ओढीने

अर्थात हरिप्रेमानेच प्राप्त होतो. अन्यथा उताण्या तळहातावर आवळा प्रत्यक्ष असूनही तेथे स्थिर राहातच नाही, तो घरंगळून निघून जातो. तसा 'हरि' स्वरूपाचा अनुभव येईल.

पाऱ्याचे कण अर्थात रवा भूमीवर सांडला तर कितीही प्रयत्न करूनही तो मिळविता येत नाही तसे मनात भावच नसला तर परमेश्वर स्वरूपाचा अनुभव, नवविधाभक्तीने किंवा होमहवन मंत्रतंत्र विधिनिषेध तीर्थयात्रा अशा कर्मकांडात्मक स्वरूपात कितीही साधना करूनही 'हरि' मिळणार नाही असे तिसऱ्या चरणात सांगतात. वास्तविक ठायीच त्या निर्गुण, निराकार, निर्विकार, सर्वव्यापी, महाशून्य, अविनाशी, केवल, आद्य, स्वसंवेद्य, सच्चिदानंदरूप, अनंत, श्रीकृष्ण, श्रीराम असा परब्रह्म, परमात्मा हरि हा जीवात्मस्वरूपात स्थित आहे. स्वसंवेद्यतेमुळे तो मनाला जाणवतो खरा, पण त्यासाठी मनाला त्याच्याकडे वळवावे लागते. सद्गुरूकृपेने त्याच्या अर्थात 'हरि' जपाची गोडी मनाला लागली की मनात स्वरूप होण्याचा भाव बळावतो आणि मनोस्वरूप सिद्धी होते. अन्यथा मन वासनादेहात गुंतल्याने चंचल आणि विकारी होते आणि ठायीचे आत्मरूपही चंचलतेने आवळ्याप्रमाणे किंवा जमिनीवर पडेलल्या पाऱ्याप्रमाणे वाटते. मात्र मनात स्वरूपभाव बळावला की ठायीच स्वरूपता येते.

अखेरच्या अर्थात चरणात माऊली सांगतात, सद्गुरू निवृत्तीनाथांनी ते निर्गुण संपूर्णपणे माझ्या हाती दिले अर्थात सद्गुरूकृपेने मी ठायीच पूर्णत्वाचा अनुभव घेऊ लागलो. ॐ पूर्ण मदः पूर्ण मिदम, पूर्णात पूर्ण मुदचते, पूर्णस्य पूर्णमादाय, पूर्णमेवा वशिष्यते याचा ठायीच अनुभव येऊ लागला.

## (१३)

द्वैत बुद्धीचे समदृष्टीने निरसन केल्याशिवाय हरिस्वरूप सिद्धी घडणार नाही हे अद्वैताचे मर्म माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज तेराव्या अभंगात उलगडून सांगतात.

**समाधि हरीची सम सुखेंविण । न साधेल जाण द्वैतबुद्धि ।।१।।**
**बुद्धीचें वैभव अन्य नाहीं दुजे । एका केशवा राजें सकल सिद्धी ।।२।।**
**ऋद्धि सिद्धी निधी अवघीच उपाधि । जंव त्या परमानंदी मन नाही ।।३।।**
**ज्ञानदेवो रम्य रमलें समाधान । हरीचे चिंतन सर्वकाळ ।।४।।**

हरिस्वरूपाशी समाधी साधावयाची असेल; तर सर्वाभूति तेच हरिस्वरूप आहे. अर्थात तेच आद्य स्वसंवेद्य आत्मरूप चराचरातील सर्वरूपांनी नटले आहे किंवा आविष्कृत झाले आहे. अशा समदृष्टीने वर्तन करणे हा स्वभाव होणे आवश्यक आहे. याचाच अर्थ द्वैतभाव अथवा द्वैतबुद्धी सांडली पाहिजे. कारण द्वैतबुद्धी ठेवून; सम सुखाची प्राप्ती अर्थात स्वरूप सुखप्राप्ती अर्थात जीवात्म्याचे परमात्म्याशी अद्वैत शक्य नाही. म्हणूनच द्वैतबुद्धी सांडून; समदृष्टीने मनोस्वरूप स्थिती निर्माण होणे आवश्यक आहे. असे अभंगाच्या प्रथम चरणात माऊली स्पष्टपणे सांगतात.

माणूस हा मन, बुद्धि आणि वाणी या दृष्टीने पूर्ण विकसित असा प्राणी आहे. तो आद्य स्वसंवेद्य आत्मरूप, जीवात्म्याच्या ठिकाणी, मनाच्या ठिकाणी आणि वाणीच्या योगानेही, स्वरूप स्थितीने, अर्थात अद्वैत भावाने अनुभवू शकतो. माणसाच्या ठिकाणी असलेल्या बुद्धीने, केशवाशी अर्थात निजरूपाशी स्वरूप होऊन; केशवस्वरूप अनुभवणे, हेच खरे बुद्धीचे वैभव अर्थात बुद्धीची महानता होय. केशवराज स्वरूप होणे म्हणजे सकळ स्थिती प्राप्त होणे अर्थात अद्वैत सुखाचा अनुभव घेणे होय. असे दुसऱ्या चरणात निरोपित केले आहे.

तर तिसऱ्या चरणात ऋद्धी, सिद्धी यांचा निधी अर्थात यांचे वैभव ही सर्व; परमानंदात मन नसेल, अर्थात परमानंदस्वरूप होता येत नसेल तर; केवळ लौकिकात दांभिकपणाने मिरविण्याची, अर्थात चमत्कार करून, लोकांना

स्वतःकडे खेचण्याची उपाधी ठरेल, असे माऊली मार्गदर्शन करतात.

ऋद्धी, सिद्धी या योगमार्गामधील अर्थात सर्वच योगमार्गातील समाधीकडे जात असतांनाच्या टप्प्यावरील, स्वरूपाच्या, स्वसंवेद्यता शक्तीचे प्राकट्य होण्याची अवस्था आहे. अष्टसिद्धी आणि सूक्ष्म सिद्धी प्राप्त झाल्या की आपणच स्वसंवेद्य स्वरूपात कोणताही संचार करू शकतो; असे मनोस्वरूपाला भासते. मात्र असे करतांना लौकिकाची आसक्ती मनाचे ठायी असल्याने, पूर्ण अद्वैत सिद्धी घडलेली नसते. द्वैत बुद्धि अद्यापही रेंगाळतच असते. सिद्धी प्राप्त झालेला साधक सिद्ध म्हणून अर्थात देवत्व प्राप्ती झाली आहे; म्हणून मिरविण्याची शक्यता असते. त्यामुळे तो या बेगडी प्रतिष्ठेमध्येच धन्यता मानू लागतो. पूर्णअद्वैत होण्यापासून तो वंचित राहातो. पूर्णअद्वैत साधणे हेच तर मानवी मनः शक्तीचे खरे वैभव आहे; असे माऊली सांगतात. म्हणजेच सिद्धी हा पूर्ण अद्वैतांतील अडसर बनून; तो सिद्धप्रज्ञेचा देखावा अर्थात उपाधी मात्र होतो.

माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, सर्वकाळ 'हरि'चिंतनातच वेळ घालवणाऱ्याचे मन स्वतःच समाधानात रमल्याने, रम्यच झाले. स्वतःच समाधान झाले. सम+धान अर्थात अद्वैत झाले. सर्वकाळ 'हरि'चिंतनाने, स्वरूपसिद्धीचे समाधान मिळते. याकरिता ऋद्धीसिद्धींच्या उपाधीमध्ये न अडकता सर्वकाळ हरिचिंतन करीत ठायीच मनोस्वरूप होऊन; स्वरूपसिद्धीचा अनुभव घेत राहावे, यातच माणसाच्या, पूर्णविकसित बुद्धिमत्तेचे, खरे श्रेय साठविले आहे.

## (१४)

नित्य हरिपाठाचे महत्त्व माऊली चवदाव्या अभंगात समजावून सांगतात.

**नित्य सत्यमित हरिपाठ ज्यासी । कळिकाळ त्यासी न पाहे दृष्टी ।।१।।**

**रामकृष्ण उच्चार अनंत राशी ताप । पापाचे कळप पळती पुढे ।।२।।**
**हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा । म्हणती जे वाचा तया मोक्ष ।।३।।**
**ज्ञानदेवा पाठ नारायण नाम । पाविजे उत्तम निजस्थान ।।४।।**

जो नित्य सत्यस्वरूप अशा हरिचे अर्थात जो हरि प्रमाणाने, अर्थात मितरूप सत्य आहे, अशा हरिचा पाठ करतो. अर्थात नामस्मरण करतो; त्याला कळिकाळाचे अर्थात प्रत्यक्ष कळी आणि मृत्यूचेही भय नाही. कोणत्याही स्थळकाळ परिस्थितीची त्याच्याकडे वक्रदृष्टीने पाहण्याची हिंमत होत नाही. कोणत्याही स्थितिगतिमध्ये त्या भक्ताचा विनाश करण्याएवढी शक्ती नसते, असे नामभक्तीचे महात्म्य पहिल्या चरणात माऊलींनी सांगितले आहे.

केवळ रामकृष्ण उच्चारानेही अनंत पापराशी किंवा अगणित अशा पापांचे कळप पुढे पळू लागतात अर्थात नाहिसे होतात. अशी ग्वाही माऊलींनी दुसऱ्या चरणात दिली आहे.

हरि, हरि, हरि असा निजरूपाविषयीचा निजरूप सिद्धीचा मंत्र साक्षात शिव स्वतःच म्हणत असतात व त्यामुळेच ते शिवस्वरूप अर्थात आद्य स्वसंवेद्य आत्मरूप आहेत. 'हरि' ह्या नामाला मंत्रसामर्थ्य आहे कारण 'हरि' हा वाणी उच्चारच 'स्वरूप' सिद्ध आहे. तो शिवांचा मंत्र, जो आपल्या वाचेने म्हणतो, त्याला स्वरूपस्थिती प्राप्त होणारच. अर्थात मोक्ष मिळणारच; असे ठामपणे माऊलींनी तिसऱ्या चरणात निवेदित केले आहे.

याकरिता आपण सर्वांनी नारायणाचे अर्थात 'हरि'चे नामस्मरण अर्थात पाठ करून, उत्तम अशा अर्थात सच्चिदानंद स्वरूप अशा, निज म्हणजेच केवळ, आद्य स्वसंवेद्य असे आत्मरूप व्हावे. अर्थात निजस्थिती प्राप्त करावी. म्हणजेच निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापी, महाशून्य, अविनाशी, अनंत, सच्चिदानंदस्वरूप, श्रीकृष्ण, शिव अशा स्वसंवेद्य आत्मस्वरूप स्थितीत पावावे. स्वरूपस्थितीस

जाऊन; पूर्ण पावन, अर्थात सच्चिदानंद स्वरूप व्हावे; असे माऊली, संत श्री ज्ञानेश्वर महाराज सांगतात.

## (१५)

केवळ 'हरि'नाम स्मरणाने अद्वैत सिद्धीपर्यंत जाता येते व ठायीच स्वरूप होता येते. ह्या प्रक्रियेचे वर्णन पंधराव्या अभंगात माऊली करतात.

**एक नाम हरि द्वैतनाम दुरी । अद्वैत कुसरी विरळा जाणे ।।१।।**
**समबुद्धि घेतां समान श्रीहरी । शमदमावैरी हरि झाला ।।२।।**
**सर्वांघटीं राम देहादेहीं एक । सूर्य प्रकाशक सहस्त्ररश्मी ।।३।।**
**ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा । मागिलिया जन्मा मुक्त झालों ।।४।।**

एका 'हरि'भजन उपायाने द्वैतभावाचे नावसुद्धा शिल्लक राहात नाही ही अद्वैत जाणण्याची कुसरी अर्थात कलात्मक बारकावा अर्थात विशेष कौशल्यात्मका जाणणारा विरळाच होय असे प्रथम चरणात माऊली आत्मविश्वासाने सांगतात.

एकदा सर्वांभूती तेच आत्मतत्त्वस्थित आहे, तेच निजरूप सर्व रूपांनी आविष्कृत झाले आहे; अशी समदृष्टी प्राप्त झाली; की श्रीहरि देखील, समत्वाने जाणवतो. अर्थात ठायीच श्रीहरिस्वरूप होता येते. मग समदृष्टीला आड येणारे, द्वैतबुद्धीपूरक असे शमदमादिविकाररूपी वैरी देखील नाहिसे होऊन; जीवच हरिस्वरूप झाला असे घडते. ही अद्वैताची प्रक्रिया द्वितीय चरणात माऊलींनी प्रतिपादिली आहे.

सहस्त्ररश्मी सूर्य आपल्या अगणित किरणोत्सर्गाने प्रकाशमान झाला की अवघा अंधार जसा नाहिसा होतो, सर्वच प्रकाशित होते; तसेच 'हरि'स्मरणाने समत्व प्रकाशमान झाले की ते रामस्वरूप सर्व आकारांना आणि सर्व जीवांच्या देहात, एकचपणाने, समत्वाने स्थित असल्याची संवेद्यता प्रकटते. असे तिसऱ्या चरणात सांगतात.

माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज चवथ्या चरणात स्पष्ट करतात की, चित्ताने एकाग्रपणे अर्थात नेमाने हरिपाठ केला. अर्थात हरिनामभक्ती अनन्यपणे केली की; मागील्या जन्मजन्मांतरातून पूर्ण मुक्त झालो आहोत, असा ठायीच अनुभव येतो. स्वरूपस्थितीला मरण आणि जन्म नसतोच असे माऊली म्हणतात.

## (१६)

'हरि'स्मरण हा, बुद्धीच्या तर्कांकुतर्कांचा चर्चेचा विषय नव्हे; तर तो श्रद्धेचा आणि सद्‌गुरूकृपेने झालेल्या ज्ञानात्मक अनुभूतीचा विषय आहे. याकरिता सद्‌गुरूकृपेने श्रद्धेने हरिपाठ गावा, असे माऊली सोळाव्या अभंगात सांगतात.

**हरिनाम बुद्धि जपे तो नर दुर्लभ । वाचेसी सुलभ रामकृष्ण ।।१।।**
**रामकृष्ण नामी उन्मनी लाधली । तयासी लाधली सकळ सिद्धी ।।२।।**
**सिद्धी बुद्धि धर्म हरिपाठीं आले । प्रपंची निमाले साधुसंगे ।।३।।**
**ज्ञानदेवीं नाम रामकृष्ण ठसा । येणें दशदिशां आत्माराम ।।४।।**

हरिनाम वाचेने उच्चारणे सुलभ असून; चिंतनपूर्वक अर्थात चिकित्सा, विचार, अर्थ इ. दृष्टीने बौद्धिक कसरती करीत, नाम घेणारा नर, दुर्लभच होय. येथे चिकित्सा उपयोगाची नाही किंवा भौतिकता उपयोगितेचा विचारही योग्य नव्हे.

नाम जपात रमणारे मन उन्मन अवस्थेस जाते अर्थात भावात्मक आणि ज्ञानात्मक अवस्थेस जाते म्हणजे नामस्मरणाने स्वरूपस्थिती अर्थात अद्वैत स्थितीपर्यंत जाता येते आणि त्याला सर्वसिद्धी अर्थात चारीमुक्तींचा लाभ होतो अशी ग्वाही माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज

दुसऱ्या चरणात प्रतिपादित करतात.

अष्टसिद्धी, बुद्धी अर्थात शास्त्रविचार इ. आणि न्यायनीती विधिनिषेधात्मक असा धर्म हे सारे 'हरि'पाठी आपसुकच येतात अर्थात हरिपाठातच सामावले आहे. कारण हरिनाम स्मरणानेच समत्वदृष्टी प्राप्त होऊन; उन्मन अवस्थेत, ज्ञानात्मक अवस्थेपर्यंत, म्हणजे मनोस्वरूप होऊन; आद्य स्वसंवेद्य आत्मरूप स्वरूपसिद्धी प्राप्त होते. सत्संगाने अर्थात साधूंच्या संगतीत हे सर्व कर्मकांड निमून जातात. निष्प्रभ होतात. प्रपंचात परमार्थ साधण्यासाठी साधूसंगतीची आवश्यकता माऊली कथन करतात.

रामकृष्ण नाममय मन झाले; म्हणजे मनावर रामकृष्ण नामजपाचा वाणीद्वारे ठसा उमटला, अर्थात वळण लागले; की दाही दिशा आत्माराम भरल्याची अनुभूती येऊ लागते. अर्थात 'हरि'जपाने मनोस्वरूपस्थितीस पोचले की; सर्वाभूती ते आद्य स्वसंवेद्य आत्मरूप अर्थात निर्गुण निजरूपच आहे याची प्रतिती येऊ लागते आणि ठायीच अद्वैताची अनुभूती घेता येते. माऊली या चवथ्या चरणात असा निर्वाळा देतात.

## (१७)

हरिपाठ ही स्वरूप होण्याची गुरुकिल्ली निवृत्तीनाथांच्या कृपेने लाभली असून, 'हरिपाठाची' कीर्ती अर्थात महत्ता समजून घेऊन जो हरिपाठ गायील त्याचा उद्धार निश्चित होईल याची खात्री माऊली सतराव्या अभंगात देतात–

**हरिपाठ कीर्ती मुखें जरी गाय । पवित्रचि होय देह त्याचा ।।१।।**
**तपाचे सामर्थ्ये तपिन्नला अमुप । चिरंजीव कल्प वैकुंठी नांदे ।।२।।**
**मातृपितृभ्राता सगोत्र अपार । चतुर्भुज नर होऊनि ठेले ।।३।।**
**ज्ञान गूढरम्य ज्ञानदेवा लाधले । निवृत्तीनें दिलें माझ्या हाती ।।४।।**



हरिपाठाचे महत्त्व अर्थात हरिपाठाची प्रसिद्धी अशी आहे की; जो कोणी थोडा जरी अर्थात एखादेवेळी जरी, अर्थात जरा जरी गातो; त्याचा देहच पवित्र होऊन जातो. हरिपाठ ही नामभक्ति आहे. हरिपाठ गायिला की ओघानेच स्वरूपाचे ज्ञान होते आणि नराचा जन्म सार्थकी लागतो. त्याला याचि देही याचि डोळा निजस्वरूपाचा अनुभव घेता येतो, असे माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज प्रथम चरणात सांगतात.

एरवी अमुप अर्थात अमाप तप करून तपी झाला तरी त्याला ठायीच स्वरूपस्थिती अनुभवता येणे कठीण. समाधीयोगाने त्याला चिरंजीव पद भोगावेसे वाटले तरी, चिरंजीवपदी जाणे अर्थात चिरंजीव कल्प घडणे अर्थात चिरंजीवपदात परिवर्तत होणे वैकुंठगमन केल्यावरच घडते. तेच हरिपाठ केल्याने ठायीच अमर्त्यता, अर्थात चिरंजीवपद अर्थात अविनाशी अनंत सच्चिदानंदरूप ठायीच अनुभवता येते. असे दुसऱ्या चरणात हरिपाठाची अलौकिकता सांगत, माऊली आत्मविश्वासाने सांगतात.

नात्यागोत्यांच्या गराड्यात नर पुरुषार्थ करून चतुर्भुज झाले. कीर्ति प्राप्त करणारे झाले, विष्णूपदी पोचले तरी त्यांना स्वरूपस्थिती, प्रपंचात केवळ कर्तृत्वाने साधता आली नाही असे तिसऱ्या चरणात स्पष्ट करून; हरिपाठातील हे गूढ गम्य ज्ञान अर्थात नामभक्तीतील हे अलौकिक सामर्थ्य सद्गुरू निवृत्तीनाथांनी माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या हातात सोपविले ते हरिपाठरूपी ज्ञान माऊली सर्वांसाठी खुले करीत आहे. सद्गुरूकृपेने नामभक्तीचे सामर्थ्य कसे लाभले हे माऊली शेवटच्या चरणात स्पष्ट करतात.

## (१८)

हरिनामाचा छंद जडला, हरिनाम संकीर्तनात रमला, हरिवंशकथा पुराणात रमला अर्थात नामभक्तीत रमलेल्याला ठायीच वैकुंठप्राप्ती होते असे अठराव्या अभंगात कथन करतांना माऊली म्हणतात–

**हरिवंशपुराण हरिनाम संकीर्तन । हरिविण सौजन्य नेणे कांहीं ।।१।।**
**त्या नरा लाधले वैकुंठ जोडलें । सकळही घडले तीर्थाटन ।।२।।**
**मनोमार्गे गेला तो येथे मुकला । हरिपाठी स्थिरावला तोचि धन्य ।।३।।**
**ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी । राम कृष्णीं आवडी सर्वकाळ ।।४।।**

हरिप्रेमाऐवजी अर्थात हरिसौजन्याऐवजी, दुसरे काहीही ज्याला माहीत नसते अशी भक्त व्यक्ती केवळ हरिवंश पुराण अर्थात हरि अवतार कथा कीर्तनातच, त्याच्या नामसंकीर्तनातच दंग असते. अशा अनन्य भक्ताच्या हरिसमर्पित स्वभावाचे वर्णन प्रथम चरणात माऊली करतात.

अशा अनन्य भक्ताला सहजच वैकुंठ जोडले जाते. अर्थात माऊली इतरत्र सांगतात त्याप्रमाणे सर्वाभूती असलेला विष्णू ठायीही असतोच, म्हणजेच स्वतःचा देह हे हरिचे निवासस्थान असतेच. हरिनाम संकीर्तनाने मनोस्वरूप असा भक्त ठायीच वैकुंठाचा स्वरूपस्थितीने अनुभव घेतो. अर्थातच अशा भक्ताला वैकुंठशोधार्थ तीर्थाटने करावीच लागत नाहीत. कारण स्वरूपस्थितीने सर्व तीर्थाटने आपोआप ठायीच घडतात. म्हणजेच तो नर अवघाच पावन होतो, असे दुसऱ्या चरणात माऊली स्पष्ट करतात.

जो वासनादेहाच्या वासनाभावनात आधीन होऊन हरिभजन विसरून तसेच ठायीचे आत्मरूप विसरून वासनाविकाराधीनतेने, मनाप्रमाणे अर्थात मर्त्य व्यवहारातच, रागलोभाच्या विळख्यातच गुंततो; तो स्वस्वरूपाला अर्थात ठायीच्या वैकुंठानुभूतीला अर्थात सच्चिदानंद स्वरूपस्थितीला मुकतो असे तिसऱ्या चरणात प्रतिपादित करतात.

वासनाविकारात गढून गेलेल्या नराला माऊली सावध करतात. शेवटच्या चरणात माऊली उपदेश करतात. हरिनामजपाची गोडी जोडी अर्थात छंद लावून घ्यावा आणि रामकृष्णाचे भजनात सर्वकाळ दंग राहावे; म्हणजे चारीमुक्ती आपसूकच साधतील.

परंपरेप्रमाणे : नामस्मरण अर्थात भजन : ।। विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल ।। गातात.



## (१९)

एकोणीसाव्या अभंगात वैष्णवांच्या नित्य नामसंकीर्तन स्वभावाचे वर्णन माऊली करतात–

**नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी । पापें अनंत कोटी गेली त्यांची ।।१।।**
**अनंत जन्मांचे तप एक नाम । सर्व मार्ग सुगम हरिपाठ ।।२।।**
**योग याग क्रिया धर्माधर्म माया । गेले ते विलया हरिपाठे ।।३।।**
**ज्ञानदेवीं यज्ञ याग क्रिया धर्म । हरिवीण नेम नाहीं दुजा ।।४।।**

वैष्णव संप्रदायात अनुसार, नामसंकीर्तनात दंग होणे, अशा मार्गाने, जो जातो; त्याची अनंत प्रकारची पापे अर्थात अनंत कोटी पापे नाश पावतात. असे पहिल्या चरणात माऊली म्हणतात.

अनंत जन्मांत तप करूनही जे मिळणे कठीण ते हरिपाठ मार्गाने एक हरिनामाचा जप करण्याने साधते असा हरिपाठ हा स्वरूप होण्याचा म्हणजे अद्वैत होण्याचा अतिशय सुगम अर्थात सहज समजेल असा मार्ग आहे. असे दुसऱ्या चरणात माऊली ठामपणाने सांगतात.

हरिपाठ मार्ग सुरू झाला अर्थात नवविधाभक्तीतील नामस्मरण हा अतिशय सोपा मार्ग सापडला आणि योग, याग, तंत्रक्रिया, मंत्रविद्या, धर्माचे विधिनिषेध आणि तात्त्विक वितंड, माया सगळे मार्ग एका हरिपाठ मार्गात अर्थात नामजप मार्गात विलीन झाले. अर्थात भागवत संप्रदाय उदयास आला आणि शैव, शाक्त, गाणपत्य, सूर्य, पांचराग अर्थात वैष्णव असे सर्व मार्ग व त्यातील विधीविधानादी मंत्रतंत्र, अनुष्ठाने, योगसाधना सारे पंथ, एका हरिपाठाच्या पंथात अर्थात वारकरी तथा भागवत पंथात लयास गेले. अर्थात मिसळून गेले. असे दुसऱ्या चरणात माऊलींनी आवर्जून सांगितले आहे. त्यातून हरिपाठ या सुगम मार्गाची महानता माऊलींनी स्पष्ट केली आहे.

शेवटच्या चरणात माऊली स्पष्ट करतात की यज्ञ, याग, क्रिया,

धर्मकर्ममीमांसा या सर्व गोष्टींमध्ये हरिभक्ति नसेल तर; सारे व्यर्थ होय. म्हणूनच 'हरि'भजन हाच एकमेव नेम आहे. अर्थात मार्ग सर्वांना सुलभ होय, असे माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज ठामपणे बजावतात.

## (२०)

विसाव्या अभंगात नामजप हेच वेदांताचेही सार आहे. नामजपाने मनोस्वरूप सिद्ध झाले की स्वरूपसिद्धीची अनुभूती मिळते, असे माऊली सांगतात.

**वेदशास्त्रप्रमाण श्रुतींचे वचन । एक नारायण सार जप तप ।।१।।**
**जप तप कर्म हरिवीण धर्म । वाऊगाचि श्रम व्यर्थ जाय ।।२।।**
**हरिपाठीं गेले ते निवांतचि ठेले । भ्रमर गुंतले सुमनकळिकें ।।३।।**
**ज्ञानदेवी मंत्र हरिनामाचें शस्त्र । यमें कुळगोत्र वर्जियेले ।।४।।**

वेदशास्त्रादि सर्व श्रुतींच्या प्रमाणाने एक नारायण हाच निर्गुण, निराकार, सर्वव्यापी, सार्वकालिक, महाशून्य, अविनाशी, अनंत, श्रीकृष्ण, आद्य स्वसंवेद्य, निज, केवळ, स्वरूप, सच्चिदानंदरूप, असे आत्मरूप सर्व भूतमात्रांच्या रूपांनी आविष्कृत झाले आहे. माणसाच्या पूर्ण विकसित प्रज्ञेला ते ठायीच अवगत झाले आहे. वासनादेहाच्या वासनाभावनांत स्वसंवेद्य अशा जीवात्म्याचा विसर स्वसंवेद्य अशा मनाला पडतो ते वासनाविकारात वाहवत जाऊ शकते आणि संसारप्रपंचात लिप्तपणे, बद्धपणे दुःखभोग भोगत राहाते. त्या मनाला त्याच स्वसंवेद्य शक्तीने मनोस्वरूप स्थिती प्राप्त करून देण्यासाठी, सर्व श्रुतींचे सार, असे 'हरि'नाम; ज्याची नारायण, राम, कृष्ण, विठ्ठल, पांडुरंग, अशी सहस्त्रनामे आहेत; त्या 'हरि'नामाचा जप केला, त्या नामाचीच तपश्चर्या केली अर्थात सर्वकाळ त्या 'हरि'स्वरूपाचेच भजन केले; तर चारीमुक्ती ठायीच, संसारप्रपंचातच अनुभवता येतील. लोकी-विलोकी, देही-विदेही असे निष्काम कर्म करून कर्तव्यतत्पर असा, निजरूपाप्रमाणे सच्चिदानंदस्वरूप ज्ञानवान कर्मपर असा, व्यवहार करता येईल तेच करणे श्रेयस्कर होय, असे प्रथम चरणात माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज वेदांत स्पष्ट करून सांगतात.

द्वितीय चरणात, 'हरि'नाम अर्थात हरिस्वरूपाचे स्मरण आणि जाणीव न ठेवता अर्थात हरिवीण, धर्मकर्मविधिनिषेध, जपतप, यज्ञयाग, अनुष्ठान, योग आचरणे म्हणजे केवळ वायाच व्यर्थ असे श्रमण्यासारखे होईल. याने मुक्ती लाभणार नाही हे समुपदेशन करतात.

तिसऱ्या चरणात भागवत तथा वारकरी संप्रदायाच्या अनुसार पद्धतीप्रमाणे 'हरिपाठ' नित्य जप या मार्गाने जे अनुसरण करतात ते निवांतपणे अर्थात कर्तव्यतत्परतेने अलिप्तपणे यशस्वी संसारप्रपंच करीत जीवनमुक्तीचा आनंद अनुभवत ठेले अर्थात राहतात. अन्य मार्गाने मुक्ती मिळविण्याचा प्रयत्न करणारे आणि संमोहक संसारप्रपंचातील वासना भावनांच्या मध्येच सच्चिदानंदसुख शोधणारे लोक; कमल सुमनातील बीसतंतु खाण्यास चटावलेल्या भ्रमराप्रमाणे गुंतून; रात्रसमयी, मिटलेल्या कमलफुलात बंदिस्त होऊन; काळरात्र भोगतात, असा अनुभव दृष्टांताने माऊलींनी उलगडून दाखविला आहे.

चवथ्या चरणात माऊलींनी 'हरि' हा मंत्र जप हेच शस्त्र हाती घेऊन जीवन व्यतीत करावे म्हणजे यम तुमच्या कुलत्रोगाच्या वाटेलाही जाणार नाही अर्थात तुमचे कुलगोत्रही उद्धरून जाईल, असा निर्वाळा दिला आहे.

## (२१)

'हरि'नाम हे पूर्ण निर्दोष असल्यामुळे त्याचा केव्हाही कोठेही जप करता येतो आणि 'हरि'नाम उच्चारणारा आणि श्रवण करणारा दोहोंचाही स्वाभाविकपणे उद्धार होतो असे एकविसाव्या अभंगात स्पष्ट करतांना माऊली म्हणतात-

**काळ वेळ नाम उच्चारितां नाहीं । दोन्ही पक्ष पाहीं उद्धरती ।।१।।**
**राम कृष्ण नाम सर्व दोषा हरण । जडजीवा तारण हरि एक ।।२।।**
**हरिनाम सार जिव्हां या नामाची । उपमा त्या देवाची कोण वानी ।।३।।**
**ज्ञानदेवा सांग झाला हरिपाठ । पूर्वजा वैकुंठ मार्ग सोपा ।।४।।**

माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज पहिल्या चरणात नामजपाची अलौकिकता स्पष्ट करतात. नाम उच्चारण्यास काळवेळेचे कोणतेही बंधन नाही. नामउच्चारणाने म्हणणारा आणि ऐकणारा असे दोन्ही पक्ष उद्धरतात हे सांगतात.

दुसऱ्या चरणात राम कृष्ण नाम सर्वदोष तर हरण करतातच. त्याचबरोबर जड आणि जीव अर्थात चेतन अशा सर्व भूतमात्रांचा उद्धार करण्यासाठी अर्थात भवसागरातून यशस्वीपणे तरून जाण्यासाठीचा एकमेव उपाय आहे हे स्पष्ट करतात.

तिसऱ्या चरणात जिव्हेंला या नामोच्चाराची सवय लागली अर्थात जिव्हेचा स्वभावच नामोच्चार असा झाला अर्थात जिव्हाच नामोच्चारस्वरूप झाली अर्थात जिव्हा आणि नामोच्चार यांचे अद्वैत घडले; की सार प्राप्त झाले अर्थात वेदांताचे सार म्हणजे अद्वैत स्थिती हे होय; तसे ठायी जीवात्माच परमात्मास्वरूप होईल. जिव्हेने मनोस्वरूप होऊन स्वस्वरूपस्थिती प्राप्त होईल हे माऊलींनी स्पष्ट केले आहे. असे स्वस्वरूप स्थितीस गेले की त्या स्थितीला उपमा देताच येत नाही. तो अनुपम्य सुखसोहळा अर्थात सच्चिदानंदस्वरूप भोगता येतो.

हे स्पष्ट करून चवथ्या चरणात माऊली म्हणतात, असा सर्वांग परिपूर्ण अर्थात सांग असा हरिपाठ झाला म्हणजेच नामोच्चार हा जिव्हेचा स्वभाव झाला की तो मनाचा स्वभाव होतो आणि मनोस्वरूपाचे ठायीच जीवात्म्याची परमात्मस्वरूपता अनुभवून जीवमुक्त होतो. संसारप्रपंचातच चारीमुक्तींचा अनुभव घेता येतो. त्यामुळे तो स्वतः तर वैकुंठधाम अनुभवतोच त्याचबरोबर ज्या पूर्वजांचा तो अवतार असतो ते पूर्वजही सहजच सोपेपणे वैकुंठाला प्राप्त होतात. अर्थात सांग अशा हरिपाठाने स्वतःसह सर्व कुळाचा उद्धार होतो.



## (२२)

बाविसाव्या अभंगात दुर्लभ असा विष्णूलोक हरिपाठाने सहज प्राप्त होतो हे माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज परोपरीने सांगतात–

**नित्य नेम नामीं ते प्राणी दुर्लभ । लक्ष्मुमीवल्लभ तयांजवळी ।।१।।**
**नारायण हरि नारायण हरि । भुक्ति मुक्ति चारी घरीं त्यांच्या ।।२।।**
**हरिवीण जन्म तो नर्कचि पै जाणा । यमाचा पाहुणा प्राणी होय ।।३।।**
**ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड । गगनाहूनि वाड नाम त्याचे ।।४।।**

सर्व प्राणीमात्रांसाठी दुर्लभ असा लक्ष्मीवल्लभ अर्थात निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापक आद्य स्वसंवेद्य आत्म रूप, सच्चिदानंदरूप असा भगवंत; जीवात्म्याचे ठिकाणी मनोस्वरूपाने संवेदित होणे हे; नित्य नेमाने जो प्राणी अर्थात मनुष्य नाम जप करतो त्या भक्ताच्या जवळ तो सहजच अर्थात स्वाभाविकपणेच असतो. अर्थात श्री लक्ष्मीवल्लभ श्री विष्णू भगवंत प्राप्त होणे दुर्लभ. मात्र नित्य नेमाने नामजप करणाऱ्याच्या जवळ तो वास करतो, असे पहिल्या चरणात माऊली स्पष्टपणे सांगतात.

नारायण हरि असा सर्वकाळ जप करणाऱ्याच्या घरी अर्थात त्याच्या ठिकाणी सलोकता, समीपता, सरूपता आणि सायुज्यता या चारही मुक्ति स्वाभाविकपणे अनुभवता येतात असे दुसऱ्या चरणात निवेदित करून; ‘हरि’जपाचा महिमा स्पष्ट केला आहे.

तिसऱ्या चरणात जन्माला आलेल्या माणसाच्या जिव्हेला जर हरिभक्तीचे वळण नसेल तर त्याचा जन्मच नर्कस्वरूप होतो आणि तो प्राणी यमाचा पाहुणा होतो अर्थात तो जन्ममृत्यूच्या फेऱ्यातच अडकतो;

असे म्हणून माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज चवथ्या चरणात, ज्ञानदेवांनी त्या सच्चिदानंद स्वरूपाच्या हरि या नामाची महती सद्‌गुरू श्री निवृत्तीनाथांना विचारताच, निवृत्तीनाथांनी प्रश्नाच्या उत्तरातील चाड अर्थात मर्म, ते नाम अथांग गगनाहूनही वाड अर्थात मोठे आहे, असा निर्वाळा दिला.

## (२३)

योग, समाधी, तप, विधिनिषेध आदि कष्टप्रद मार्गांनी न मिळविता येणारे; चारीमुक्तींचा अनुभव घेणारे ज्ञान रामकृष्ण पंथ मार्गाने सहज लाभते, असा निर्वाळा दिला आहे.

**सात पांच तीन दशकांचा मेळा । एकतत्त्वीं कळा दावी हरी ।।१।।**
**तैसें नव्हे नाम सर्व मार्ग वरिष्ठ । तेथे काही कष्ट न लगती ।।२।।**
**अजपा जपणे उलट प्राणाचा । तेथेंही मनाचा निर्धार असे ।।३।।**
**ज्ञानदेवा जिणे नामेंविण व्यर्थ । रामकृष्णी पंथ क्रमियेला ।।४।।**

सात जन्म तपश्चर्या केली, पंचप्राण एकवटून तप केले, स्वर्ग मृत्यू पाताळ धुंडाळून शोधले किंवा दशकांचा मेळा अर्थात शेकडा असे शेकडो वर्षे प्रयत्न तरी एवढा काळ खर्च करूनही तो काळ एकच तत्त्व अर्थात श्री हरि हेच एकतत्त्व असे प्रत्ययास येते. असे हे सर्वश्रेष्ठ नाम श्रीहरि घेतांना वाचेला मात्र काही कष्ट पडत नाही असे पहिल्या दोन चरणात माऊली निवेदित करतात.

तिसऱ्या चरणात ते पुढे सांगतात, निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापी असे आद्य, निज, केवळ आत्मरूप हे खरेतर नाव नसलेले अर्थात अजपा आहे, त्याचा जप उलट प्राणाचा सराव करून; अर्थात प्राणायामाद्वारे करावयाचा; तर त्याला निर्धार लागतो. हा निर्धार वासनादेहाच्या वासनाभावनांच्या आहारी जाऊन चंचल, लालची झालेल्या संवेद्यतेच्या अर्थात मनाच्या ठिकाणी करावा लागतो. एवढे हे कष्टप्रद आहे.

त्याऐवजी रामकृष्ण पंथ क्रमणे सुलभ होय. तेथे केवळ 'हरि' हे नाव त्या स्वरूपाचे कल्पून ते उच्चारण्याची सवय, सहज कोणताही उच्चार करणाऱ्या जिभेला लावायची की आपसूकच नामउच्चारण्याचा जिव्हेचा स्वभाव होतो त्यामुळे मनाला सतत स्मरण होऊन प्रपंचव्यवहार करतांनाही मन मनोस्वरूपाने वर्तन करू लागते आणि मनाच्या ठायीच जीवात्म्याची स्वरूपस्थिती अनुभूत होऊन; परमेश्वर जशी अलिप्त राहून सच्चिदानंद स्वभावाने विश्वाविष्कार क्रीडा करीत आहे; तसे जीव अलिप्तपणे स्वरूपस्थितीत केवळ कर्तव्यकर्म म्हणून जीवनक्रीडा करील; एवढा हा नामस्मरणाचा अर्थात नामभक्तीचा, रामकृष्णपंथ हा सोपा मार्ग आहे. म्हणूनच चवथ्या व शेवटच्या चरणात माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, नामावीण जीवन व्यर्थ होय!

## (२४)

चोविसाव्या अभंगात सर्वाभूती विष्णू, कृष्ण, शिव, नारायण, विठ्ठल, राम आहे अशा दृढ विश्वासाने नामस्मरण करीत जीवनव्यवहार करीत असावे.

**जप तप कर्म क्रिया नेम धर्म । सर्वां घटीं राम भावशुद्ध ।।१।।**
**न सोडी रे भावो टाकी रे संदेहो । रामकृष्णीं टाहो नित्य फोडी ।।२।।**
**जात वित्त गोत कुळ शीळ मात । भजेका त्वरित भावनी युक्त ।।३।।**
**ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं । तेणें वैकुंठभुवनी घर केलें ।।४।।**

सर्व भूतमात्रांमध्ये अर्थात सर्वां घटी राम हाच नांदतो आहे असा समत्वाचा शुद्धभाव मनात ठेवून रामकृष्ण पंथाचा अनुसार अर्थात जप, तप, कर्म, क्रिया, नेमधर्म करीत राहावे असे प्रथम चरणात माऊली निवेदित करतात.

हा शुद्धभाव कधीही टाकायचा नाही. मनात संदेह निर्माण होऊ द्यायचा नाही. झालाच तर पंथातील सद्गुरूंच्या सांगीप्रमाणे तो टाकून द्यायचा आणि नित्य रामकृष्ण नामाचा जीवाभावाने उच्चार करायचा अर्थात टाहो फोडायचा, असे दुसऱ्या चरणात सांगतात.

तिसऱ्या चरणात जात, वित्त, गोत, कुळ, शील अशा कोणत्याही कारणाने मनाच्या ठायी जे द्वैत निर्माण होते त्यावर मात करून; त्वरित शुद्धभाव जागवून; अर्थात भावनायुक्त होऊन; हरिभजनात दंग व्हावे; असे माऊली कारुण्याने सांगतात.

चवथ्या चरणात माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज निर्वाळा देतात की, ज्या शुद्धभावयुक्त भक्ताच्या ध्यानीमनी, अर्थात संसारप्रपंचात व्यवहारात ध्यान असतांनाही मनाचे ठिकाणी केवळ रामकृष्ण नामस्मरण सुरू असते त्याने वैकुंठातच घर झाले असा अनुभव येतो त्याला सहजच चारी मुक्ती प्राप्त होतात.

## (२५)

हरि नामस्मरणातच नित्य मुक्ती आहे हे तत्त्व पंचविसाव्या अभंगात परोपरीने स्पष्ट केले आहे.

**जाणीव नेणीव भगवंती नाहीं । हरि उच्चारणीं पाहीं मोक्ष सदा ।।१।।**
**नारायण हरी उच्चार नामाचा । तेथे कळिकाळाचा रीघ नाहीं ।।२।।**
**तेथील प्रमाण नेणवें वेदांसी । ते जीवजंतूंसी केवीं कळे ।।३।।**
**ज्ञानदेवा फळ नारायण पाठ । सर्वत्र वैकुंठ केलें असे ।।४।।**

ज्ञान आणि अज्ञान अर्थात जिवंतपण आणि मृत्यू किंवा प्रकाश आणि अंधार या गोष्टी भगवंताला नाहीतच. कारण तो नित्य निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापी आद्य, स्वसंवेद्य, सच्चिदानंदरूप असे आत्मरूप आहे. म्हणूनच हरिच्या ठायी अर्थात परमात्म स्वरूपाच्या ठायी सदैव मोक्षच आहे.

आद्य स्वसंवेद्य असे आत्मरूप नित्य मुक्तच आहे. त्यालाच आपण नारायण, हरि, राम, कृष्ण, शिव, गोविंद, विठ्ठल या नावाने हाक मारतो. नावच नसलेल्याला शुद्धभावाने मानवाप्रमाणे नाव देऊन हाक मारली तर; तो सर्वाभूती असल्याने, त्या नामाच्या ठिकाणी प्रकट होतो म्हणून नारायण हरी या नावाचा उच्चार करताच सतभक्ताच्या ठायी स्वरूपस्थितीने तो मनोस्वरूप अनुभवू लागतो. जीवनमुक्तता ठायीच प्रकटते. त्यामुळेच या नामोच्चाराच्या ठिकाणी कळिकाळाला अर्थात कुतर्क आणि मृत्यूला विध अर्थात प्रवेशच नाही, असे पहिल्या दोन चरणात माऊली निरोपित करतात.

तो स्वरूप, निर्गुण, निराकार, निर्विकार, सार्वकालिक, सर्वव्यापी, महाशून्य, निज, केवळ, अंत, अविनाशी, सच्चिदानंदरूप असे नित्यमुक्त आत्मरूप आहे. त्यामुळे विश्वाचे वर्णन आणि कार्यकारण भाव विशद करणाऱ्या वेदांनाही; त्या स्वरूपाचा तार्किक थांग लागला नाही. मग त्याचा उलगडा जीवजंतूंना अर्थात प्राणिमात्रांना अर्थात त्यातील माणसाला त्याचा, तर्कता थांग कसा लागणार? त्याची अनुभूती मात्र नामस्मरणाने मनोस्वरूप होऊन घेता येते.

चवथ्या चरणात माऊली नारायण पाठाचे फळ सांगतात. नामस्म रणाने प्रत्येकाला स्वरूपस्थितीचा अर्थात आद्यस्वसंवेद्य आत्मरूपाची अनुभूती मनोस्वरूपाने जीवात्म्याच्या स्वरूपस्थितीमुळे घडू शकते. असे सद्भक्त जीवमात्र त्या आत्मरूपाचे निवासस्थान वैकुंठ सर्वत्रच अनुभवू लागतो. अर्थात अद्वैत स्थितीने जाणीव नेणीव यांच्या पलिकडील मुक्त अवस्था अनुभूत करू लागतो; असे माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

## (२६)

वासनादेहाच्या आधीनतेने न वागता निश्चय आणि निग्रहपूर्वक हरिभजन करीत राहा. या हरिभजनाच्या योगानेच तो परमात्मा करुणामूर्ती

असल्याने उद्धार करील आणि भक्ताला ठायीच मुक्ती मिळेल, अशी ग्वाही देऊन हरिभजनाचा आग्रह धरतात.

**एक तत्त्व नाम दृढ धरीं मना । हरीसी करुणा येईल तुझी ।।१।।**
**तें नाम सोपें रे रामकृष्ण गोविंद । वाचेशी सद्‌गद जपें आधीं ।।२।।**
**नामापरतें तत्व नाहीं रे अन्यथा । वायां आणिक पंथा जाशी झणीं ।।३।।**
**ज्ञानदेवा नाम मौन जपमाळ अंतरी । धरोनी श्रीहरीं जपें सदा ।।४।।**

मनाचे ठिकाणी नाम हेच तत्त्व आहे अर्थात नामस्वरूपाने ते निर्गुण तत्त्व प्रकट आहे हे पक्के लक्षात ठेव म्हणजे 'हरि'ला तुझी करुणा येईल अर्थात तुझ्या ठायीचे स्वरूप मनोस्वरूपाने प्रकटेल. ते रामकृष्ण नाम अतिशय उच्चारणास सोपे आहे. ते सद्‌गदीत होऊन अर्थात शुद्ध अद्वैतभाव मनात एकवटून; अगोदर जप कर असे माऊली प्रथम आणि द्वितीय चरणात समजावून सांगतात.

तिसऱ्या चरणात माऊली द्विरुक्तीने नामापेक्षा अन्य कोणतेही तत्त्व सर्वथा नाही. नाम हेच स्वरूप असे अनंत अविनाशी निर्गुण आहे; हे लक्षात घेऊन; उगाचच क्लेशदायक, कठीण अशा अन्य कोणत्याही योग, याग, मंत्र, तंत्र इ. मार्गाला जाऊ नये, असा उपदेश करतात. असे केल्याने लवकरच आत्मघात ओढवून घेशील हेही स्पष्ट करतात.

चवथ्या चरणात माऊली नामोच्चाराची मौन जपमाळ सदैव अंतरात ठेऊन; मुखाने नामस्मरण अर्थात सतत हरिनामाचा जप कर, असा भगवद्‌भक्ताला संदेश देतात.

**(२७)**

वासनादेहाच्या आड लपून नामस्मरणाला पारखा होऊ नकोस. नामस्मरणानेच कोटी पाप नाहिसे होईल अशी ग्वाही माऊली सत्ताविसाव्या



अभंगात देतात.

**सर्व सुख गोडी सर्वशास्त्रनिवडी । रिकामा अर्धघडी राहू नको ।।१।।**
**लटिका व्यवहार सर्व हा संसार । वायां येरझार हरीविण ।।२।।**
**नाम मंत्र जप कोटी जाईल पाप । रामकृष्णी संकल्प धरूनि राहे ।।३।।**
**निजवृत्ति काढीं सर्व माया तोडी । इंद्रिया सवडी लपो नको ।।४।।**
**तीर्थव्रतीं भाव धरी रे करुणा । शांतिदया पाहुणा हरि करी ।।५।।**
**ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवी ज्ञान । समाधि संजीवन हरिपाठ ।।६।।**

सर्वशास्त्रांचा धांडोळा केल्यानंतरही सर्वसुखाची गोडी अनुभूत करणारे हरिभजन हेच एकमेव तत्त्व पुढे येते. हे तत्त्व भजतांना अर्धघडी देखील विसंबू नकोस, हरिभजनावीण रिकामा राहू नकोस असे पहिल्या चरणात माऊली सांगतात.

हा संसारप्रपंच केवळ लटका आहे. त्यातील व्यवहारही लटका आहे. कारण हा संसारप्रपंचातील व्यवहार मानवी समूहाच्या सुखासाठी मानवी समूहाने, मानव निर्मित स्वरूपात मांडला आहे. अन्यथा मानवी व्यवहार हा केवळ नाटकाचा खेळ आहे. वस्तुतः हा संसारप्रपंच त्या अविनाशी परब्रह्म स्वरूपाची आभासात्मक, परिवर्तनशील लीला आहे. अशा काल्पनिक आणि आभासात्मक अस्तित्वाचा अहंकार न धरता हरिनाम भजन कर अन्यथा उगाचच जन्ममृत्यूच्या येरझारीत तू अडकून पडील आणि प्राप्त जन्मही व्यर्थ होईल असे पहिल्या दोन चरणात प्रतिपादित करून माऊली प्रापंचिकाला अध्यात्मिक जीवनासाठी जागृत करतात.

रामकृष्ण नामजपाचा संकल्प करून ठामपणे रामकृष्ण मंत्राचा जप करीत राहिलास तरच कोटी पापही नाहिसे होईल; असे माऊली तिसऱ्या चरणात आश्वासन देतात.

चवथ्या चरणात माऊली ज्ञानात्मक क्रिया करण्याचे निरोपित

करतात. हे भक्ता निजरूप काढी अर्थात ठायीच जीवात्मा स्वरूपात असलेल्या स्वरूपाचे मनोस्वरूपाने चिंतन कर. माया संसारप्रपंचाची सर्व माया तोड. संसारप्रपंच व्यवहारातील आसक्ती दूर करून; अलिप्त हो. केवळ देहाच्या वासना वृत्ती-प्रवृत्तीच्या आड लपून; ठायीच्या जिवंतपणाला अर्थात मनोस्वरूपाने ज्ञात होणाऱ्या जीवात्मा स्थितीतील स्वस्वरूपापासून दूर जाऊ नकोस असे सांगतात.

लौकिकातील तीर्थ, व्रते यांविषयी अनास्था न ठेवता त्यांच्याविषयी भक्तिभावाने सर्वांविषयी मनात करुणापूर्णता प्रकट कर म्हणजे हरि हा शांतिदयायुक्त पाहुणा तुझ्या घरी येईल. अर्थात सत्यनिष्ठेने ज्ञानप्राप्ती होते आणि ज्ञानाने सर्वाभूती करुणा निर्माण होते. ही प्रक्रिया ठायीच्या मनोस्वरूपाने आत्मस्वरूपाच्या ठिकाणी निर्माण होते.

सहाव्या चरणात निवृत्तिदेवतांच्या कृपेने मिळालेल्या, जीवनाला संजीवन समाधी अनुभव देणारे ज्ञान प्राप्त झाले आहे. म्हणूनच हरिपाठ हीच संजीवन समाधी आहे, असे माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

## (२८)

हरिपाठाच्या समारोपाच्या अभंगात श्रीगुरू-निवृत्तिवचनाने अर्थात आशीर्वादाने माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराज संतोषले अर्थात हरिपाठ सिद्धीत सफल झाले असे म्हटले आहे.

**अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस । रचिले विश्वासें ज्ञानदेवे ।।१।।**
**नित्य पाठ करी इंद्रायणीतीरीं । होय अधिकारी सर्वथा तो ।।२।।**
**असावें एकाग्रीं स्वस्थ चित्त मन । उल्हासे करून स्मरण जीवीं ।।३।।**
**अंतकाळीं तैसा संकटाचे वेळीं । हरि तया सांभाळी अंतर्बाह्य ।।४।।**
**संत सज्जनांनी घेतली प्रचीती । आळशी मंदगती केवीं तरें ।।५।।**
**श्रीगुरू-निवृत्तिवचन प्रेमळ । तोषला तात्काळ ज्ञानदेव ।।६।।**



माऊली संत श्री ज्ञानदेव महाराजांनी हरिपाठाचे असलेले अठ्ठावीस अभंग मोठ्या विश्वासाने रचले. इंद्रायणीतीरी या अभंगांचा नित्यपाठ ते करीत त्यामुळे ते सर्वथा अधिकारी झाले. अर्थात जो कोणी इंद्रायणीच्या तीरी या अभंगाचा नित्यपाठ करेल तो सर्वथा अधिकारी होतो. अर्थात तो भक्त स्वरूपस्थितीस प्राप्त होतो. संत ज्ञानेश्वर स्वरूपस्थितीत गेले असे पहिल्या दोन चरणात निवेदित केले आहे.

तिसऱ्या चरणात पाठाचे अनुष्ठान कसे करावे हे सांगितले आहे. स्वस्थचित्त, एकाग्र मन करून, आनंदाने, अर्थात उल्हासाने, जीवाभावाने, अर्थात शुद्ध भावाने, मनुष्यमात्राने हरिपाठाचे स्मरण अर्थात पाठ करावा.

चवथ्या चरणात हरिपाठाची फलनिष्पत्ती सांगितली आहे. जो कोणी स्वस्थचित्त, एकाग्रमन करून शुद्धभावाने हरिपाठ करील त्याला संकटकाली आणि अंतकाळी हरि अंतरबाह्य सांभाळील. त्याचा देह कृतार्थ होईल आणि तो मनोस्वरूपाने स्वरूपस्थिती अनुभवेल.

पाचव्या चरणात या फलनिष्पत्तीला प्रमाण दिले आहे. अर्थात आळशी, मंदमती यांना हे फळ मिळणार नाही. संतसज्जनांनी मात्र याची प्रचिती घेतली आहे.

सहाव्या चरणात कृतज्ञता व्यक्त केली आहे. श्रीगुरू-निवृत्ति यांच्या प्रेमळ अर्थात वात्सल्यपूर्ण वचनांनी अर्थात आशिर्वादाने, माऊली ज्ञानेश्वरांना तात्काळ फलप्राप्ती झाली. त्यांचे देह आणि अंतःकरण पावन झाले. माऊली स्वरूपस्थितीला गेले, असे सांगितले आहे.

## (२९)

नामस्मरणाने सर्वप्रकारे बद्धता फिटून ज्ञान प्रकटेल असे माऊलींनी सांगितले आहे.

**कोणाचे हे घर हा देह कोणाचा । आत्माराम त्याचा तोचि जाणे ।।१।।**
**मी तूं हा विचार विवेक शोधावा । गोविंदा माधवा याच देहीं ।।२।।**
**देहीं ध्याता ध्यान त्रिपुटी वेगळा । सहस्त्र दळीं उगवला सूर्य जैसा ।।३।।**
**ज्ञानदेव म्हणे नयनाची ज्योती । या नांवे रूपे ती तुम्ही जाणा ।।४।।**

देहाने जन्माला आलेला प्राणी, माणूस नांव, गोत्र, जात, धर्म, देश, समाज इ. उपाधींनी अहंकारग्रस्त होतो. त्यामुळे त्याचा देह हे नेमके कोणाचे घर वासनादेहाच्या वासना भावनांचे की; आद्य स्वसंवेद्य आत्मरूप जीवात्मा स्वरूपाने स्थित असते म्हणून असा जिवंत अस्तित्वाचा अनुभव येतो त्या जीवात्म्याचे, घर आहे? या प्रश्नाचे उत्तर तो जीवात्म्याच्या स्वरूपाने असलेले स्वरूप अर्थात निजरूप अर्थात आत्माराम देऊ शकेल.

देह नाशवंत आहे, अनित्य आहे तर आत्माराम नित्य आहे, असे पहिल्या चरणात चिंतन केले आहे.

जीवाच्या ठिकाणी मी, तू असे द्वैत असते. ते अहंकारवशतेने आलेले असते. वस्तुतः सर्वांभूती तो विष्णूच अर्थात स्वसंवेद्य आत्म रूपच आविष्कृत आहे. हीच तर भगवंताची लीला आहे. म्हणूनच मी, तू – या भ्रामण अस्तित्वाचा शोध घ्यावा आणि गोविंद माधव या नावांनी वेगवेगळे वाटणारे अस्तित्व स्वरूपस्थितीत अद्वैतच आहे व हे याच मानवाच्या पूर्णतः विकसित अशा देहाकारात मनोस्वरूपाने उमगू शकेल ते अनुभवावे असे दुसऱ्या चरणात सांगितले आहे.

हरिनाम जिव्हेच्या माध्यमातून या देहांतर्गत प्रविष्ट केले तर जिव्हा स्वभावाने नामस्वरूप होईल त्यामुळे मनोस्वरूपस्थिती घडून त्रिपुटी अर्थात सत्व, रज, तमात्मक अहंकारवशता नाहिशी होईल, गळून पडेल आणि सहस्त्रदलरूप किरणांनी ज्ञानसूर्य प्रकाशमान होईल, असे निवेदित केले आहे.

चवथ्या चरणात माऊली नयनाची ज्योती अर्थात ज्ञान ज्योती प्रकाशली की नाम आणि रूप भिन्न राहाणार नाही आपण जाणताच.

हरिपाठाचे अठ्ठावीस अभंग आहेत असे या आवृत्तीमध्ये अठ्ठाविसाव्या अभंगात दिले आहे आणि पुढे एकोणतिसावा अभंग दिला आहे. त्यातील पहिल्या क्रमाने सत्तावीस अभंगातील श्री ज्ञानदेवांच्या नाममुद्रेचा विचार करता; एकोणतिसावा म्हणून दिलेला अभंग, हाच अठ्ठाविसावा अभंग आहे, असे लक्षात येईल. अठ्ठावीस क्रमांकावर दिलेला अभंग हा हरिपाठाचा समारोप आहे हे सहज लक्षात येईल. बहुधा तसे वाचणे जास्त प्रशस्त वाटते.

वरील प्रकारे एकोणतीस अभंग क्रमाने देऊन खाली हरिपाठ समाप्तीची उद्घोषणा केली आहे.

।। इति श्री ज्ञानेश्वर महाराज हरिपाठ समाप्त ।।

* * *

# पायी दिंडी सोहळ्याचे प्रेरक महर्षी अगस्तिमुनी

महर्षी अगस्तिमुनी यांचा पालखीरथ पंढरपूर येथे आषाढी वारीच्या निमित्ताने जातो. 'श्री अगस्ति ऋषी देवस्थान ट्रस्ट'मधील सर्व विश्वस्तांना महर्षी अगस्ति मुनींचा पालखीरथ अर्थात पायी दिंडी सोहळा घडवावा, असे उत्कटतेने वाटत होते. महाराष्ट्रातील भागवत तथा वारकरी संप्रदायाचा प्रभाव हे एक कारण तर या मागे आहेच; त्याचबरोबर महर्षी अगस्तिमुनी यांची आपल्या भक्तांना मिळालेली प्रेरणा हे कारण अंतस्त्रोतासारखे या पायी दिंडी सोहळ्यामागे आहे.

महर्षी अगस्तिमुनी आणि महर्षी लोपामुद्रा हे ऋषी दांपत्य वैदिक ऋषी दांपत्य आहे. वेदांत या उभयतांच्या अनेक ऋचा स्वतंत्रपणे आलेल्या आहेत. वैदिक परंपरा ही आस्तिक तथा अद्वैत परंपरा होय. या परंपरेला ब्रह्मर्षी नारदमुनींनी भक्तियोग परंपरेची जोड देऊन; भक्तिमार्गाने प्रपंचात राहून अद्वैत अनुभूती घेण्याचा मार्ग खुला केला. महर्षी अगस्तिमुनी आणि ब्रह्मर्षी नारद यांनी अतिमहत्त्वाची अशी अनेक कार्ये एकत्रितपणे केल्याच्या कथा वेदोपनिषदांत आणि पुराणांत प्रसिद्ध आहेत. अमृतमंथन प्रसंगात अमृतवाहिनी प्रवाहित करून घेण्याचे कार्य या ऋषीद्वयाने केले. अमृतवाहिनीलाच प्रवरा असे नाव महर्षी अगस्तिमुनींनी दिले.

या प्रसंगानंतर निधी निवासात म्हणजे प्रवरा तीरावरील नेवासा या गावात मोहिनीराज मोहिनी आणि विष्णू या दोन्ही रूपांत, अर्धनारीनटेश्वरांप्रमाणे स्थित झाले. तर महर्षी अगस्तिमुनींनी ब्रह्मर्षी नारदांना अर्थात भगवद्भक्तालाही प्रवरातीरी स्थित होण्याचा आग्रह करून; ब्रह्मर्षी नारदांची स्थापना नेवासा येथे केली. प्रवरेच्या दक्षिण तीरावर मोहिनीराज तर उत्तर तीरावर नारद स्थित झाले. याच उत्तर तीरावर महालया म्हाळसांचे स्थान आहे. श्री विष्णूभक्त भगवान शिवांना मोहिनी स्वरूपातील भगवंतांशी विवाह करण्याचा मोह झाला. मोहिनीराज रूपांतील भगवान विष्णूंनी वैवस्वत मनुत ही लीला कृत युगात पूर्ण होण्याचे आश्वासन दिले. ते आश्वासन म्हाळसाई स्वरूपात भगवंतांनी पूर्ण केले. आजच्या म्हाळादेवी या तीर्थक्षेत्री ही शिवविष्णू अद्वैत लीला, मार्तंडभैरव अर्थात खंडोबा आणि म्हाळसाई यांच्या विवाहाने पूर्णत्वास गेली.

समुद्रमंथनानंतर महर्षी अगस्तिमुनी आणि महर्षी लोपामुद्रा या दांपत्याने प्रवरातीरी; उत्तर तीरावर आश्रम स्थापन करून; समाधीमग्नतेने, चिरंतनासाठी, सूक्ष्मरूपाने तथा कधी प्रकटरूपाने राहून विश्वातील अगस्त्य आश्रमांतील गुरुकुलांचे नियोजन व विद्याप्रसाद करण्याचे ठरविले. काशी निवासी महर्षी अगस्तिमुनी अगस्त्यपूर क्षेत्र स्थापित करून येथे राहू लागले. काशीनगरीत अगस्तिकुंड हे महर्षी अगस्तिमुनींचे निवासस्थान होय. येथेही ते सूक्ष्म आणि प्रकट रूपाने राहू लागले.

कलीयुगात नामभक्तीने अद्वैत साधून जीवनमुक्त होता येईल या भगवंतांच्या परामर्षानुसार महर्षी अगस्तिमुनींनी ब्रह्मर्षी नारदांना पूर्ण सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. या आश्वासन पूर्तीतील एक लीला म्हणजे; काशीनगरीत विठ्ठलपंतांना दृष्टांत देऊन; रामानंद स्वामींच्या रूपात पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा देण्याची प्रेरणा देणे होय. तसेच रामानंद स्वामींनी दिलेल्या आज्ञेला प्रत्यक्ष यतिरूपात विठ्ठलपंतांना दर्शन देऊन पाठिंबा देणे, ही लीला घडविणे होय.

पुढे विठ्ठलपंत आणि रुक्मिणीदेवी यांनी संन्यास त्याग करून प्रपंच केला. चार मुले झाली. नेवासा येथे आदिनाथ शिव अर्थात श्री सिद्धेश्वर अर्थात करवीरेश्वर किंवा कनैरेश्वर महादेव मंदिरात, श्री विष्णुभगवंतांचे पूर्णावतार श्री कृष्णांच्या मुखातून वेदोपनिषदांचे सारस्वरूप प्रकटलेल्या; श्रीमद्भगवद् गीतेवर 'भावार्थ दीपिका' अर्थात 'श्री ज्ञानेश्वरी' असा ग्रंथ माऊली संत श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या मुखाने प्रकट झाला. भागवत धर्म तत्त्वज्ञानाचा पाया घातला गेला. आज भागवत धर्म अर्थात भक्तिमार्गे अद्वैत साधना मार्ग अर्थात प्रपंचात राहून परमार्थ साधण्याचा परिपूर्ण मार्ग; विश्वात विख्यात आणि प्रशस्त झाला आहे. महर्षी अगस्तिमुनींच्या

प्रेरक साहाय्याने प्रवरेच्या तीरी पंढरीच्या श्री विठूरायांच्या भक्तीचीच वहिवाट या लीलांनी दृढमूल झाली. ‘रामकृष्णहरि’ हा मंत्र प्रकटला. ही सर्व लीला अनिल सहस्रबुद्धे लिखित ‘अगस्त्य’ या कादंबरीत वर्णिलेली आहे. तसेच त्यांच्याकडून लिहिल्या गेलेल्या महर्षी अगस्तिमुनी यांच्या करिताच्या ‘अगस्त्य महात्म्य’ या उपासना पोथीतही या लीलेचा उल्लेख आहे. महर्षी अगस्तिमुनींचे हे कार्य ‘श्री अगस्त्यऋषी अभंगावली’तील अभंगात वर्णिले आहे.-

**अद्वैताचा मार्ग कली साधियेला । अगस्त्यांची दिंडी पंढरीला ।।१।।**
**आश्रमी दाटतो अगस्त्य भक्तमेळा । पालखी खांद्याला लागाविशी ।।२।।**
**काशी नगरीत संबोधी विठ्ठला । ज्ञाना प्रकटावा कलियुगे ।।३।।**
**लेकुरांच्या सवे मुनिही चालला । मुखे घोष होई ज्ञाना तुका ।।४।।**
**सत्ययुग वाट कली युगी चाले । अगस्त्य मार्गाने अनिल म्हणे ।।५।।**

ही ऐतिहासिक प्रेरणा महर्षी अगस्तिमुनी रथ तथा पालखी पायी दिंडी सोहळा या उपक्रमामागे आहे.

आता पायी दिंडी सोहळा सुरू होऊन तप उलटले आहे. ही तपश्चर्या करण्याची प्रेरणा, ‘श्री अगस्ति ऋषी देवस्थान ट्रस्ट’चे अध्यक्ष मा.ॲड. के. डी. धुमाळ यांच्यासह ट्रस्टच्या सर्व मान्यवर विश्वस्तांच्या मनात महर्षी अगस्तिमुनींनी प्रेरित केली. देणगी स्वरूपात जमवाजमव करत अकोले ते पंढरपूर आणि अकोले ते त्र्यंबकेश्वर अर्थात सद्गुरू निवृत्तीनाथ यांच्या भेटीसाठी असे पर्याय नियोजित झाले. या दिंडी सोहळ्याचे अध्यक्ष या नात्याने ह.भ.प. आत्माराम महाराज शेळके आणि त्यानंतर ह.भ.प. विष्णू महाराज वाकचौरे यांनी जबाबदारी घेतली. या द्वयांनंतर ह.भ.प. राजेद्र महाराज नवले हे अक्षरशः झोकून देऊन ही जबाबदारी सांभाळत आहेत.

दिंडी सोहळा पर्याय सुरू होण्यासाठी, तो पारंपरिक होण्यासाठी अक्षरशः असंख्य महर्षी अगस्त्यभक्तांचे तथा ह.भ.प. मान्यवरांचे मौलिक साहाय्य लाभत आहे. यात मान. श्रीमान बद्रिनारायणशेठजी मुंदडा या धर्मात्म्यांनी या उपक्रमासाठी नैतिक तथा श्रद्धा बळ प्राप्त व्हावे यासाठी श्रीमद् ज्ञानेश्वरीची एक्कावन्न पारायणे महर्षी अगस्तिमुनी मंदिरात बसून केली.

या दिंडी सोहळ्याच्या पूर्ण यशस्वितेसाठी; ट्रस्टच्यावतीने ट्रस्टचे देवस्थानचे व्यवस्थापक म्हणून सेवारत असलेले श्रीमान रामनाथजी मुतडक त्यांच्या गर्दनी गावचे व्यवस्थापन आणि तेथील हायस्कूल व्यवस्थापनाचे कार्य आदर्शवत पार पाडत असतांनाही; अक्षरशः समर्पण बुद्धीने दिंडी सोहळा व्यवस्थापनाची कार्यसेवाही करीत आहेत.

महर्षी अगस्तिमुनींचे नित्य स्मरण व्हावे आणि महर्षींनी सर्वांचा माऊलीवत सांभाळ करावा; यासाठी अगस्त्यभक्त ‘हरिपाठ’ पाठाप्रमाणेच, अगस्त्य नित्यपाठही परंपरेने करीत आहेत. हा नित्यपाठ सर्वांसाठी या ग्रंथात हरिपाठाबरोबर, याच सद्हेतूने ग्रथित केला आहे.

# अगस्त्य नित्यपाठाचे अभंग

नित्य स्मरा मुनी । नित्य स्मरा ऋषी ।
तपी सिद्ध योगी । अगस्त्य हा ।।१।।
प्रवरेच्या तीरी । रम्यशा आश्रमी ।
क्रिया मग्न ज्ञानी । अगस्त्य हा ।।२।।
शब्दांचा उद्‌गाता । चतुर्वाणी सिद्ध ।
प्रसिद्ध तामिजा । सुसंस्कृत ।।३।।
लोकांचा कैवारी । पशुपक्षी प्रेमी ।
सृष्टीचा पुजारी । अगस्त्य हा ।।४।।
महातेज शक्ती । विंध्या शिष्य करी ।
सूर्यचंद्रा क्रमी । राखितसे ।।५।।
धनुर्योद्धा भारी । आयुर्वेदाचारी ।
त्रिकालज्ञ सिद्धी । नाडी ज्ञाता ।।६।।
पत्नी लोपामुद्रे । निर्मिली नाविन्ये ।
गोत्रज उद्धरणे । अगस्त्य हा ।।७।।
वरीली कावेरी । जन हित कारी ।
दुकाळ निवारी । अगस्त्य हा ।।८।।
अग्नीवाही पुत्र । दक्षिणेचा मित्र ।
नाम दृढस्यूत । अगस्त्यांचा ।।९।।
इंद्रसखा खरा । पर्जन्य दातारा ।
कावेरी प्रवरा । धारावाही ।।१०।।
कृषी ज्ञान प्रेरी । कृषी यज्ञ करी ।
सुफलित करी । भूमीला या ।।११।।
जीवन वाहक । धारांचा प्रेरक ।
रानांचा तारक । अगस्त्य हा ।।१२।।
पशुपक्षी सारे । जलचर आवघे ।
सर्पयोनी खरे । अज्ञांकित ।।१३।।



मित्रा वरुणी पुत्र । निमित्ताला मात्र ।
विष्णू ब्रह्मा शिव । स्वये प्रकट ।।१४।।
कालकेशी मोठा । वश अहंकारा ।
लोपूनी सागरा । घातकरी ।।१५।।
दानवांचा नेता । लोकांचा शोषिता ।
यज्ञ याग तपा । नाश करी ।।१६।।
करावया नाश । अगस्त्य प्रकट ।
मान मान्य मांदार्य । मिरविला ।।१७।।
मानसी प्रकटून । शिवाज्ञा स्मरून ।
कुदळी घेऊन । निघे स्वामी ।।१८।।
अहंकारी दैत्य । मारियले सर्व ।
प्राशी वरुणालय । आचमनी ।।१९।।
अहं विदारूनी । दुकाळ निवारूनी
आणिला चरणी । शूरपद्मा ।।२०।।
वातापि इल्वला । युक्ती मारियेला ।
भ्रष्टाकार केला । देशोधडी ।।२१।।
दुष्टांचा हा अरी । सुष्टांचा कैवारी ।
रामबाण देई । रावणारी ।।२२।।
नित्य करा ध्यान । अगस्त्य चरण ।
पाशनिवारण । मुनी करी ।।२३।।
धन दारा पुत्र । देई हा सत्वर ।
पुत्र मित्र भाग्य । दायक हा ।।२४।।
संकटे भक्तांची । क्षणात निवारी ।
उद्धरूनी जाशी । त्याच्या कृपे ।।२५।।
परम सुखाचा । दर्शक मार्गाचा ।
ठेवा कैवल्याचा । अगस्त्य हा ।।२६।।
जावे त्या शरण । होऊनी अनन्य ।
आपणा उद्धरील । अगस्त्य हा ।।२७।।
त्याच्या चरणी काया । निवारूनी माया ।

ठेवावी अनन्या । एकनिष्ठ ।।२८।।
प्राणी जलचरे । रक्षियेले त्याने ।
अलौकिक कारुण्ये । अगस्त्य हा ।।२९।।
त्रिदेवांचे वीर्य । योगीनींचे शौर्य ।
सामर्थ्यसंपन्न । अगस्त्य हा ।।३०।।
सोमरस यांचे । पेय आवडते ।
निर्मि प्रेमभरे । यज्ञासाठी ।।३१।।
परब्रह्म सिद्ध । प्रकटे त्रिविध ।
होई एकविध । अगस्त्य रूपे ।।३२।।
अगस्त्य शिवरूप । भ्राता कार्तिकेय ।
धावे विघ्नहर्त्य । अगस्त्यां साठी ।।३३।।
पार्वती निरोपिला । ब्रह्म मानियेला ।
सप्तर्षी लाभला । मान त्यासी ।।३४।।
सकल सिद्धांचा । शिरोमणी सिद्ध ।
सिद्धांत प्रसिद्ध । नाथरूपे ।।३५।।
ॐ अगस्त्यै नमः । जपावा हा मंत्र ।
प्रपंच परमार्थ । विजय पावे ।।३६।।
ॐ अगस्त्यै नमः । मंत्रे करा स्नान ।
चारी मुक्ती द्वार । अगस्त्य हा ।।३७।।
सति लोपामुद्रा । लोपवूनी मुद्रा ।
अगस्त्य बढीवारा । मिरवितसे ।।३८।।
निज रूप सारे । त्रिदेव स्वरूपे ।
अद्वैती प्रकटे । अगस्त्य रूप ।।३९।।
संकल्प सोडूनी । निर्विकल्प होई ।
अगस्त्य तो करी । सफल सर्व ।।४०।।
जे जे जो जो मागे । ते ते सर्व लाभे ।
एकनिष्ठ भावे । चरणी त्यांच्या ।।४१।।
माझा एक स्वामी । कृपावंत नामी ।
लावूनी सत्कर्मी । घडवी मज ।।४२।।



सद्गुरू एक ब्रह्म । झाले शिवरूप ।
अगस्त्य एकरूप । सद्गुरू ।।४३।।
विश्वात संचार । गुरुकुले विश्वभर ।
वेदांत विचार । भेदनाशे ।।४४।।
अगस्त्य अगस्त्य । स्मरा एकचित्त ।
प्रपंचात स्वस्थ । करी सदा ।।४५।।
एक हा अगस्त्य । तपाचारी नित्य ।
होई भय मुक्त । विसंबूनी ।।४६।।
शिवरूप अगस्त्य । अगस्त्य ब्रह्मरूप ।
विष्णूरूप अगस्त्य । अद्वैती हा ।।४७।।
विसंबूनी त्याशी । नित्य कर्म करी ।
उद्धरूनी जाशी त्याच्या कृपे ।।४८।।

## पायी दिंडी सोहळ्यातील महर्षी अगस्ति मुनींची आरती

आरती मुनिवरा । स्वामी महर्षी अगस्त्या ।
भजती भक्त जनम । भाव ठेवितो पाया ।।ध्रु।।

विचलित सृष्टि होई । अहंकार बळावे ।
त्रिदेव शक्ती सहित । मित्रावरुणी प्रकटे ।।१।।
आरती मुनिवरा...

करी जडजीव नियमित । विश्व सांभाळी अवघे ।
सद्गुरूचरणी अनिल । आम्ही मस्तक ठेविले ।।२।
आरती मुनिवरा...

# हरिपाठ

(१)

देवाचिया द्वारीं उभा क्षणभरी । तेणें मुक्तिचारी साधियेल्या ।।१।।
हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा । पुण्याची गणना कोण करी ।।२।।
असोनि संसारीं जिव्हे वेग करीं । वेदशास्त्र उभारीं बाह्या सदा ।।३।।
ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणें । द्वारकेचे राणे पांडवां घरी ।।४।।

(२)

चहूं वेदीं जाण साहीशास्त्रींकारण । अठराही पुराणें हरीसी गाती ।।१।।
मंथुनी नवनीता तैसे घे अनंता । वायां व्यर्थ कथा सांडीं मार्गु ।।२।।
एक हरि आत्मा जीवशिव समा । वायां दुर्गमा न घालीं मन ।।३।।
ज्ञानदेव पाठ हरि हा वैकुंठ । भरला घनदाट हरि दिसे ।।४।।

(३)

त्रिगुण असार निर्गुण हें सार । सारासार विचार हरिपाठ ।।१।।
सगुण निर्गुण गुणाचें अगुण । हरीवीण मन व्यर्थ जाय ।।२।।
अव्यक्त निराकार नाहीं त्या आकार । जेथुनि चराचर हरिसी भजें ।।३।।
ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं । अनंत जन्मांनी पुण्य होय ।।४।।

(४)

भावेंवीण भक्ति भक्तिवीण मुक्ति । बळेवीण शक्ति बोलूं नये ।।१।।
कैसेनि दैवत प्रसन्न त्वरित । उगा राहें निवांत शिणसीं वाया ।।२।।
सायास करिसी पंचदिननिशीं । हरिसी न भजसी कोण्या गुणें ।।३।।
ज्ञानदेव म्हणें जरि जप करणें । तुटेल धरणें प्रपंचाचे ।।४।।

(५)

योग याग विधी येणें नोहे सिद्धी । वायांचि उपाधि दंभ धर्म ।।१।।
भावेवीण देव न कळे निःसंदेह । गुरुविण अनुभव कैंसा कळे ।।२।।
तपेवीण दैवत दिधल्याविण प्राप्त । गुजेंविण हित कोण सांगे ।।३।।
ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात । साधूंचे संगती तरणोपाय ।।४।।

(६)

साधुबोध झाला तो नुरोनियां ठेला । ठायींच मुराला अनुभव ।।१।।
कापुराची वाती उजळली ज्योति । ठायींच समाप्ती झाली जैसी ।।२।।
मोक्षरेखे आला भाग्यें विनटला । साधूंचा अंकिला हरिभक्त ।।३।।
ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनीं । हरि दिसे जनीं आत्मतत्त्वीं ।।४।।

(७)

पर्वताप्रमाणें पातक करणें । वज्रलेप होणे अभक्तांसी ।।१।।
नाहीं ज्यांसी भक्ति तो पतित अभक्त । हरिसी न भजत दैव हत ।।२।।
अनंत वाचाळ बरळती बरळ । त्यां कैसा दयाळ पावे हरि ।।३।।
ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान । सर्वांघटी पूर्ण एक नांदे ।।४।।

(८)

संतांचे संगती मनोमार्गगती । आकळावा श्रीपती येणें पंथे ।।१।।
रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा । आत्मा जो शिवाचा राम जप ।।२।।
एकतत्त्व नाम साधिती साधन । द्वैताचें बंधन न बाधिजे ।।३।।
नामामृत गोडी वैष्णवां लाधली । योगियां साधली जीवनकळा ।।४।।
सत्वर उच्चार प्रल्हादीं बिंबला । उद्धवा लाधला कृष्णदाता ।।५।।
ज्ञानदेव म्हणे नाम हें सुलभ । सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे ।।६।।

(९)

विष्णूवीण जप व्यर्थ त्यांचे ज्ञान । रामकृष्णीं मन नाहीं ज्याचे ।।१।।
उपजोनी करंटा नेणें अद्वैत वाटा । रामकृष्णीं पैठा कैसेनी होये ।।२।।
द्वैताची झाडणी गुरुवीण ज्ञान । त्या कैंचे कीर्तन घडे नामीं ।।३।।
ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान । नामपाट मौन प्रपंचाचे ।।४।।

(१०)

त्रिवेणीसंगमी नाना तीर्थे भ्रमी । चित्त नाहीं नामीं तरी ते व्यर्थ ।।१।।
नामासी विन्मुख तो नर पापिया । हरीवीण धावया न पावे कोणी ।।२।।
पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मिक । नामे तिन्हीं लोक उद्धरती ।।३।।
ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरीचें । परंपरा त्याचें कुळ शुद्ध ।।४।।

(११)

हरि उच्चारणी अनंत पापराशी । जातील लयाशी क्षणमात्रें ।।१।।
तृण अग्निमेळें समरस झालें । तैसें नामें केलें जपतां हरि ।।२।।
हरि उच्चारण मंत्र हा अगाध । पळे भूतबाधा भय तेथें ।।३।।
ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ । न करवे अर्थ उपनिषदी ।।४।।

(१२)

तीर्थ व्रत नेम भावेंविण सिद्धी । वायांचि उपाधि करिसी जना ।।१।।
भावबळें आकळें थेरवी नाकळें । करतळीं आवळे तैसा हरि ।।२।।
पारियाचा रवा घेतां भूमीवरीं । यत्न परोपरी साधन तैसे ।।३।।
ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण । दिधलें संपूर्ण माझे हातीं ।।४।।

(१३)

समाधि हरीची सम सुखेंविण । न साधेल जाण द्वैतबुद्धि ।।१।।
बुद्धीचें वैभव अन्य नाहीं दुजे । एका केशवा राजें सकल सिद्धी ।।२।।
ऋद्धि सिद्धी निधी अवघीच उपाधि । जंव त्या परमानंदी मन नाही ।।३।।
ज्ञानदेवो रम्य रमलें समाधान । हरीचे चिंतन सर्वकाळ ।।४।।

(१४)

नित्य सत्यमित हरिपाठ ज्यासी । कळिकाळ त्यासी न पाहे दृष्टी ।।१।।
रामकृष्ण उच्चार अनंत राशी ताप । पापाचे कळप पळती पुढे ।।२।।
हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा । म्हणती जे वाचा तया मोक्ष ।।३।।
ज्ञानदेवा पाठ नारायण नाम । पाविजे उत्तम निजस्थान ।।४।।

(१५)

एक नाम हरि द्वैतनाम दुरी । अद्वैत कुसरी विरळा जाणे ।।१।।
समबुद्धि घेतां समान श्रीहरी । शमदमावैरी हरि झाला ।।२।।
सर्वांघटीं राम देहादेहीं एक । सूर्य प्रकाशक सहस्त्ररश्मी ।।३।।
ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा । मागिलिया जन्मा मुक्त झालों ।।४।।

(१६)

हरिनाम बुद्धि जपे तो नर दुर्लभ । वाचेसी सुलभ रामकृष्ण ।।१।।
रामकृष्ण नामी उन्मनी लाधली । तयासी लाधली सकळ सिद्धी ।।२।।
सिद्धी बुद्धि धर्म हरिपाठीं आले । प्रपंची निमाले साधुसंगे ।।३।।
ज्ञानदेवीं नाम रामकृष्ण ठसा । येणें दशदिशां आत्माराम ।।४।।

(१७)

हरिपाठ कीर्ती मुखें जरा गाय । पवित्राचे होय देह त्याचा ।।१।।
तपाचे सामर्थ्ये तपिन्नला अमुप । चिरंजीव कल्प वैकुंठी नांदे ।।२।।
मातृपितृभ्राता सगोत्र अपार । चतुर्भुज नर होऊनि ठेले ।।३।।
ज्ञान गूढरम्य ज्ञानदेवा लाधले । निवृत्तीनें दिलें माझ्या हाती ।।४।।

(१८)

हरिवंशपुराण हरिनाम संकीर्तन । हरिविण सौजन्य नेणे कांहीं ।।१।।
त्या नरा लाधले वैकुंठ जोडलें । सकळही घडले तीर्थाटन ।।२।।
मनोमार्गे गेला तो येथे मुकला । हरिपाठी स्थिरावला तोचि धन्य ।।३।।
ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी । राम कृष्णीं आवडी सर्वकाळ ।।४।।

(१९)

नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी । पापें अनंत कोटी गेली त्यांची ।।१।।
अनंत जन्मांचे तप एक नाम । सर्व मार्ग सुगम हरिपाठ ।।२।।
योग याग क्रिया धर्माधर्म माया । गेले ते विलया हरिपाठे ।।३।।
ज्ञानदेवीं यज्ञ याग क्रिया धर्म । हरिवीण नेम नाहीं दुजा ।।४।।

(२०)

वेदशास्त्रप्रमाण श्रुतींचे वचन । एक नारायण सार जप तप ।।१।।
जप तप कर्म हरिवीण धर्म । वाऊगाचि श्रम व्यर्थ जाय ।।२।।
हरिपाठीं गेले ते निवांतचि ठेले । भ्रमर गुंतले सुमनकळिकें ।।३।।
ज्ञानदेवी मंत्र हरिनामाचें शस्त्र । यमें कुळगोत्र वर्जियेले ।।४।।

(२१)

काळ वेळ नाम उच्चारितां नाहीं । दोन्ही पक्ष पाहीं उद्धरती ।।१।।
राम कृष्ण नाम सर्व दोषा हरण । जडजीवा तोरण हरि एक ।।२।।
हरिनाम सार जिव्हां या नामाची । उपमा त्या देवाची कोण वानी ।।३।।
ज्ञानदेवा सांग झाला हरिपाठ । पूर्वजा वैकुंठ मार्ग सोपा ।।४।।

(२२)

नित्य नेम नामीं ते प्राणी दुर्लभ । लक्षुमीवल्लभ तयांजवळी ।।१।।
नारायण हरि नारायण हरि । भुक्ति मुक्ति चारी घरीं त्यांच्या ।।२।।
हरिवीण जन्म तो नर्कचि पै जाणा । यमाचा पाहुणा प्राणी होय ।।३।।
ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड । गगनाहूनि वाड नाम त्याचे ।।४।।

(२३)

सात पांच तीन दशकांचा मेळा । एकतत्त्वीं कळा दावी हरी ।।१।।
तैसें नव्हे नाम सर्व वरिष्ठ । तेथे काही कष्ट न लगती ।।२।।
अजपा जपणे उलट प्राणाचा । तेथेंही मनाचा निर्धार असे ।।३।।
ज्ञानदेवा जिणे नामेंविण व्यर्थ । रामकृष्णी पंथ क्रमियेला ।।४।।

(२४)

जप तप कर्म क्रिया नेम धर्म । सर्वां घटीं राम भावशुद्ध ।।१।।
न सोडी रे भावो टाकी रे संदेहो । रामकृष्णीं टाहो नित्य फोडी ।।२।।
जात वित्त गोत कुळ शीळ मात । भजेका त्वरित भावनी युक्त ।।३।।
ज्ञानदेवा ध्वानीं रामकृष्ण मनीं । तेणें वैकुंठभुवनी घर केलें ।।४।।

(२५)

जाणीव नेणीव भगवंती नाहीं । हरि उच्चारणीं पाहीं मोक्ष सदा ।।१।।
नारायण हरी उच्चार नामाचा । तेथे कळिकाळाचा रीघ नाहीं ।।२।।
तेथील प्रमाण नेणवें वेदांसी । ते जीवजंतूंसी केवीं कळे ।।३।।
ज्ञानदेवा फळ नारायण पाठ । सर्वत्र वैकुंठ केलें असे ।।४।।



(२६)

एक तत्त्व नाम दृढ धरीं मना । हरीसी करुणा येईल तुझी ।।१।।
तें नाम सोपें रे रामकृष्ण गोविंद । वाचेशी सद्‌गत जपें आधीं ।।२।।
नामापरतें तत्व नाहीं रे अन्यथा । वायां आणिक पंथा जाशी झणीं ।।३।।
ज्ञानदेवा नाम मौन जपमाळ अंतरी । धरोनी श्रीहरीं जपें सदा ।।४।।

(२७)

सर्व सुख गोडी सर्वशास्त्रनिवडी । रिकामा अर्धघडी राहू नको ।।१।।
लटिका व्यवहार सर्व हा संसार । वायां येरझार हरीविण ।।२।।
नाम मंत्र जप कोटी जाईल पाप । रामकृष्णी संकल्प धरूनि राहे ।।३।।
निजवृत्ति काढीं सर्व माया तोडी । इंद्रिया सवडी लपो नको ।।४।।
तीर्थव्रतीं भाव धरी रे करुणा । शांतिदया पाहुणा हरि करी ।।५।।
ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवी ज्ञान । समाधि संजीवन हरिपाठ ।।६।।

(२८)

अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस । रचिले विश्वासें ज्ञानदेवे ।।१।।
नित्य पाठ करी इंद्रायणीतीरीं । होय अधिकारी सर्वथा तो ।।२।।
असावें एकाग्रीं स्वस्थ चित्त मन । उल्हासे करून स्मरण जीवीं ।।३।।
अंतकाळीं तैसा संकटाचे वेळीं । हरि तया सांभाळी अंतर्बाह्य ।।४।।
संत सज्जनांनी घेतली प्रचीती । आळशी मंदगती केवीं तरें ।।५।।
श्रीगुरू–निवृत्तिवचन प्रेमळ । तोषला तात्काळ ज्ञानदेव ।।६।।

(२९)

कोणाचे हे घर हा देह कोणाचा । आत्माराम त्याचा तोचि जाणे ।।१।।
मी तूं हा विचार विवेक शोधावा । गोविंदा माधवा याच देहीं ।।२।।
देहीं ध्याता ध्यान त्रिपुटी वेगळा । सहस्त्र दळीं उगवला सूर्य जैसा ।।३।।
ज्ञानदेव म्हणे नयनाची ज्योती । या नांवे रूपे ती तुम्ही जाणा ।।४।।

## ज्ञानेश्वरांची आरती

आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा ।
सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ।।
आरती ज्ञानराजा ।।ध्रु।।
लोपलें ज्ञान जगीं । हित नेणतीं कोणी ।
अवतार पांडुरंग । नाम ठेविलें ज्ञानी ।।१।। आरती ।।
कनकाचें ताट करीं । उभ्या गोपिका नारी ।
नारद तुंबर हो । साम गायन करी ।।२।। आरती ।।
प्रकट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केलें ।
रामजनार्दनीं । पायीं मस्तक ठेविलें ।।३।। आरती ।।

* * *